www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज


# दैनिक युवक आधार

मराठी

दै. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक – सौ भारती संतोष आमले उपसंपादक – श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक – श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक – श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 198 वा गुरुवार दि. 03 एप्रिल २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514




# मोदी सरकारला मोठं यश! वक्फ बोर्ड दुरुस्ती विधेयक

## अखेर लोकसभेत पारित, रात्री उशिरा झालं मतदान, विरोधी पक्षांना धक्का

बुधवारी दिवसभर चाललेली वादळी चर्चा, सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये झालेले आरोप प्रत्यारोपांनंतर अखेरीस मध्यरात्र उलटल्यावर झालेल्या मतदानामधून वक्फ बोर्ड दुरुस्ती विधेयक लोकसभेमध्ये पारित करण्यात झालं. या विधेयकाच्या बाजूने २८८ तर विरोधात २३२ एवढी मतं पडली. वक्फ बोर्ड दुरुस्ती विधेयक लोकसभेत पारित होणं हे केंद्रातील मोदी सरकारसाठी मोठं यश मानलं जात आहे. मात्र उल्लेखनीय बाब म्हणजे केंद्र सरकारसाठी प्रतिष्ठेच्या बनलेल्या या विधेयकावरील मतदानावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अनुपस्थित होते. त्यामुळे मतदानावेळची मोदींची अनुपस्थिती हा आता चर्चेचा विषय ठरली आहे.

अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांनी बुधवारी लोकसभेत वक्फ दुरुस्ती विधेयक २०२४ सादर केले होते. त्यानंतर या विधेयकावर दिवसभर चर्चा झाली तसेच मध्यरात्रीनंतर मतदानाला सुरुवात झाली. सुरुवातीला विरोधी पक्षांमधील सदस्यांनी विधेयकात सुचवलेल्या दुरुस्त्यांबाबत आवाजी मतदान झाले. यामध्ये दिवसभर चाललेल्या चर्चेदरम्यान, विरोधी पक्षांमधीन अनेक नेत्यांनी या विधेयकामध्ये दुरुस्त्या सूचवल्या होत्या. या दुरुस्त्या लोकसभेमध्ये आवाजी मतदानाने फेटाळून लावण्यात आल्या. एमआयएमचे असदुद्दीन ओवैसी, शिवसेना ठाकरे गटाचे अरविंद सावंत, काँग्रेसचे गौरव गोगोई, इम्रान मसूद, राजीव रंजन यांच्यासह विरोधी पक्षांमधील इतर खासदारांनी विधेयकामध्ये दुरुस्त्या सूचवल्या होत्या. मात्र या दुरुस्त्या आवाजी मतदानाने फेटाळण्यात आल्या.

त्यानंतर वक्फ बोर्ड दुरुस्ती विधेयकावर प्रत्यक्ष मतदान घेण्यात आले. यामध्ये एकूण ५२० सदस्यांनी मतदान केले. यामध्ये या विधेयकाच्या बाजूने २८८ तर विरोधात २३२ एवढी मतं पडली. केंद्रात सत्तेवर असलेल्या भाजपाकडे स्वबळावर बहुमत नसल्याने तसेच हे सरकार मित्रपक्षांच्या आधाराने चालत असल्याने लोकसभेमध्ये वक्फ बोर्ड दुरुस्ती विधेयक पारित करून घेण्याचं आव्हान मोदी सरकारसमोर होतं. मात्र सरकारने लोकसभेत सहजपणे हे विधेयक पारित करून घेतलं. आता या विधेयकावर राज्यसभेमध्ये मतदान होणार असून, तिथे हे विधेयक पारित करून घेताना केंद्र सरकारची कसोटी लागणार आहे.




## श्री.छत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालयाचा विद्यार्थी ठरला महाराष्ट्र केसरी

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

श्री.छत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय भवानीनगर येथील एफ.वाय.बी.ए.या वर्गात शिक्षण घेत असलेला पै.वेताळ शेळके हा विद्यार्थी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या मान्यतेने कर्जत जि.आहिल्यानगर येथे पार पडलेल्या ६६ व्या महाराष्ट्र केसरीच्या अंतिम लढतीत वेताळ शेळके याने बाजी मारली व महाराष्ट्र केसरीचा मानकरी ठरला.त्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा.प्रशांत दादा काटे,सचिव अशोक मोरे, महाविद्यालयाच्या प्राचार्या शिवाली माने–देशमुख,सर्व संचालक मंडळ व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्याच्या यशाबद्दल त्याचे अभिनंदन केले.




## झेन डायमंडचे आयरिस कलेक्शन सादर

### आयरिस कलेक्शनची अभिजातता आणि शानदारपणाचा अनोखा मेळ

**. दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

**मुंबई,** २ एप्रिल २०२५ :- झेन डायमंडच्या आयरिस कलेक्शनमध्ये संपूर्ण हिऱ्यांच्या दागिन्यांचा शानदारपणा आणि रंगीत स्टोन्सची चमक, हिऱ्यांचे पीसेस यांचा अनोखा मेळ घालण्यात आला आहे. शानदारपणा आणि अभिजातता यांचा अनोखा संगम साधण्यात आला आहे. यातल्या प्रत्येक दागिन्यामध्ये दुर्मिळ डिझाइन आणि आधुनिक साज यांचा मेळ घालण्यात आला असल्यामुळे आधुनिकता व पारंपरिकता आवडणाऱ्यांसाठी हे दागिने योग्य आहेत. चमकदार हिरे आणि आकर्षक रंगांतील जेमस्टोन्सने सजवण्यात आलेले आयरिस कलेक्शन सुसंस्कृतता, स्टाइल आणि व्यक्तिमत्त्वाचे प्रतीक आहे. जेमस्टोन्सचे उठावदार रंग उर्जा आणि अनोखेपण देतात, तर हिऱ्यांची चमक त्यांची शान वाढवते. खास प्रसंग असो किंवा रोजचा वापर, हे कलेक्शन तुमच्या अनोख्या आवडीला सुसंस्कृतपणाची झळाळी देतात. झेन डायमंडच्या आयरिस कलेक्शनमधील खास अंगठी आधुनिक, वैशिष्ट्यपूर्ण डिझाइन व रंगांत बनवण्यात आली आहे.



असिमेट्रिकल ओपन बँड स्टाइलसह बनवण्यात आलेली ही अंगठी दोन खास घटकांसह बनवण्यात आली आहे. एका बाजूला चमकदार हिरे मारक्विस आकारात बसवण्यात आले आहे, तर दुसऱ्या बाजूला झळाळता रूबी चमकदार सोन्यात जडवण्यात आला आहे. ही अंगठी पॅशन आणि उर्जेचे प्रतीक आहे. हिऱ्यांची शुभ्र चमक आणि रूबीचा गडद लाल रंग आकर्षक संगती साधणारा, व्यक्तिमत्त्वाचे वेगळेपण आणि अनोखी निवड दर्शवणारा आहे. **पान २ वर**

## अभिनेत्री क्रांती रेडकर यांच्या उपस्थितीत हिरकणी ग्लॅमर अवॉर्ड शो

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

**हिंगणघाट** :- शहरात आयोजित हिरकणी ग्लॅमर अवॉर्ड शो मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या भव्य कार्यक्रमाचे आयोजन कनक युनिक ब्युटी स्पा अँड अकॅडमी च्या संचालिका मीना सोनटक्के यांनी केले तर ब्युटी डे टुडे चे प्रदीप मारोटकर यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे व्यवस्थापन केले. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण प्रसिद्ध सिनेअभिनेत्री क्रांती रेडकर यांची उपस्थिती होती. त्यांनी त्यांच्या साधेपणा आणि प्रभावी व्यक्तिमत्वाने सर्वांची मने जिंकली. कार्यक्रमाचे उद्घाटन अतुल वांदिले राष्ट्रवादी चे प्रदेव्हा सरचिटणीस, सौ.अंबिका हिंगमिरे सामाजिक कार्यकर्त्या व अनुताई सोमकुवर सामाजिक कार्यकर्त्या, कार्यक्रमाचे मान्यवर अतिथी म्हणून डॉ. रमेशकुमार बोरकुटे,




CEO, बँकिंग सेक्टर, यांची उपस्थिती होती. तसेच डॉ . सचिन आणि डॉ. प्रांजल बोगावर यांचे सहकार्य लाभले. ब्युटी आणि फॅशन क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी कार्यक्रमात आपली उपस्थिती दर्शवली व उपस्थितांना सेमिनार द्वारे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमामध्ये मेघा कपूर अमेसर,नागपूर, रेखा शर्मा, वर्धा, अमित बोरकर, नागपूर व हेतल करिया, नागपूर यांनी आपल्या सत्रांमध्ये मेकअप, **पान २ वर**

## मायेची सावली एक हात कर्तव्याचा या संस्थेतर्फे संचालक श्री.दौलत बेल्हेकर यांचा वाढदिवस साजरा

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर )**

सामाजिक, आरोग्य आणि शैक्षणिक, पर्यावरण आदी क्षेत्रात कार्यरत असलेल्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे प्रणित मायेची सावली एक हात कर्तव्याचा या संस्थेतर्फे परिवारातील संचालक श्री.दौलत बेल्हेकर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.वाढदिवसाच्या निमित्त शुभेच्छा शिवभक्त संजय दत्तात्रय भालेराव तसेच मायेची सावली एक हात कर्तव्याचा पदाधिकारी शिवसैनिक संस्थापक अध्यक्ष यशवंत खोपकर, सचिव संदीप चांदिवडे, सल्लागार मेघा सावंत, कार्यालय प्रमुख वसंत घडशी, खजिनदार अक्षदा खोपकर, अपूर्वा ताई यांनी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.यावेळी संस्था पदाधिकारी, सदस्य आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# जल जिवन मिशन अंतर्गत कामाची चौकशी करा:- विजयराव पौळ माजी पंचायत समिती सदस्य

**दैनिक युवक आधार**
**रिसोड वार्ताहर**
**रणजीत सिंह ठाकुर**

रिसोड तालुक्यातील मांगवाडी येथील, जल जीवन मिशन अंतर्गत कामाची चौकशी करून, ग्रामस्थांना पाणीपुरवठा उपलब्ध करून द्यावा! अशी मागणी विजय पौळ माजी पंचायत समिती सदस्य यांनी केली आहे. सविस्तर वृत्त असे की, मांगवाडी येथील ग्राम मांगवाडी, तालुका रिसोड जिल्हा वाशिम येथील गावकऱ्यांनी मांगवाडी येथे अंदाजपत्रकानुसार जल जीवन



मिशन योजनेचे काम झाले नसल्याचे म्हटले आहे. कामाची मुदत ही माहे जुलै 2024 मध्ये संपली असून सदर काम करतेवेळी गावातील रस्ते फोडले असून त्यामुळे गावातील लोकांना येण्या जाण्याचा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच जल जीवन मिशन अंतर्गत काम अर्धवट झाले असून सदर योजनेअंतर्गत आज पर्यंत गावात पाणीपुरवठा सुरू झालेला नाही. असे या निवेदनावर आपली स्वाक्षरी करणारे मा. प.स. विजय पौळ, विनोद रामराव बाळके सरपंच, गजानन भिकाजी मोरे उपसरपंच, लता सिताराम वाळके सदस्य, विठ्ठल विष्णू कांबळे, पाटील समाधान, सखाराम वाळके, माधव विश्वनाथ वाळके, भास्कर निवृत्ती कोकाटे, दिलीप कोकाटे, प्रकाश वाळके, संजय कोकाटे, मारुती गव्हाणे, इत्यादी लोकांनी निवेदनावर सह्या केले आहेत. अर्धवट सोडलेले काम पूर्ण करून गावाला पाणी पुरवठा करावा अशी मागणी या निवेदनाद्वारे केली आहे. उन्हाळ्याचे दिवस आले असून संपूर्ण मांगवाडी गावाला पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे? गावात जलजीवन मिशन योजनेचे काम करणाऱ्या ठेकेदाराला सदर योजने बाबत विचारपूस केली असता त्यांनी उडवा उडवी ची उत्तरे दिली तरी, सदरील कामाची आपल्या स्तरावरून चौकशी करून आम्हाला योग्य तो न्याय मिळवून द्यावा! व जलजीवन मिशन अंतर्गत गावात सुरळीत पाणीपुरवठा करावा. तसे न झाल्यास गावकऱ्यांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देखील या निवेदना मध्ये देण्यात आला आहे. या निवेदनाच्या प्रती रिसोड मालेगाव मतदारसंघाचे आमदार अमित झनक, विधान परिषदेच्या **पान २ वर**

## सावली महिला प्रभाग संघ वार्षिक सर्वसाधारण बैठक आष्टी येथे संपन्न

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी: राजेश खाडे**

आज दिनांक १ एप्रिल २०२५ रोजी सावली महीला प्रभाग संघाची वार्षिक सर्वसाधारण बैठक आज आष्टी तालुका परतुर येथे घेण्यात आली या बैठकीमध्ये सर्व ग्राम संघाचा आढावा घेण्यात आला या बैठकीला उपस्थित तालुका अभिनय व्यवस्थापक संदीपस सर. एम आय एस शेळके सर. आय बी सी बी अर्चना मॅडम. वॉटर क्लस्टरच्या सीता मॅडम. कोकाटे हादगाव क्लस्टरच्या पूजा मॅडम. पाटोदा क्लस्टरच्या वर्षा मॅडम. यांनी आमच्या वार्षिक सर्वसाधारण सभेला मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या तसेच सावली महिला प्रभाग संघाचे क्लस्टर कॉर्डिनेटर रामसर. प्रभाग संघ व्यवस्थापक सुरेखा आगलावे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठकीत विषय घेण्यात आली बँकेचे कर्ज ग्राम संघाचा निधी वाटप करण्यात आला 63 लाख रुपये उद्योग विषयी मार्गदर्शन करण्यात आले व उत्पादक गटांना निधी वाटप करण्यात आला मागील वार्षिक आराखडा वाचून दाखवण्यात आला. निर्मला राऊत आष्टी. वर्षा सोळंके कराळा. शिवगंगा सोळंके आष्टी. मीरा थोरात आष्टी. वर्षा थोरात आष्टी. जया सोळंके ब्राह्मण वाडी. शोभा उबाळे आष्टी. अनिता राठोड




सृष्टी तांडा. छाया गायकवाड लिगसा. प्रतिभा खंदारे शेलगाव. अश्विनी पवार हानवाडी. लिखित पिंपरी सुरेखा सोळंके. हास्तुर तांडा पूजा राठोड इत्यादी CRP व बँक सखी ताई मंजुषा ढोले. प्रभाग संघाच्या लेखापाल ताई प्रतिभा जोशी. प्रभाग संघाचे अध्यक्ष अविद्या सोळंके कारळा. प्रभाग संघाच्या कोषाध्यक्ष शिवकन्या खाडे ताई आष्टी. प्रभाग संघाच्या सचिव गीता ताई डवले लिगसा. इत्यादी वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी उपस्थित होत्या प्रत्येक गावातून ताईंनी शंभर टक्के महिला आणल्या होत्या. अकराशे महिलांची बैठक संपन्न झाली

जि.प.के.प्रा.शाळा किर्ला व अंतर्गत च्या सर्व शाळा
ता.मंठा जि.जालना



श्री.कांबळे के.बी
(केंद्रप्रमुख किर्ला)

सेवागौरव समारंभ
गुरुवार दि.०३/०४/२०२५ रोजी सकाळी ११:०० वा
✲ प्रमुख उपस्थिती ✲
मा.श्री.विपुलजी भागवत साहेब
गटशिक्षणाधिकारी पं.स.मंठा
मा.श्री.के.जी.राठोड (भाऊ)
शिक्षण विस्तार अधिकारी पं.स.मंठा
विनीत :- मा.श्री. मुख्याध्यापक, शिक्षक वृंद,शा.व्य.समिती,केंद्र किर्ला व अंतर्गत सर्व
✲ स्थळ ✲ जि.प.उच्च प्रा.शाळा दुधा ता.मंठा जि.जालना

## संपादकीय

# राज्याचे शिल्पकार छत्रपती शिवाजी महाराज यांची पुण्यतिथी

जगणारे ते मावळे होते..
जगवणारा तो महाराष्ट्र होता..
पण स्वतःच्या कुटुंबाला विसरुन
जनतेवर मायेने हात फिरवणारा
'आपला शिवबा' होता..

शिवाजी महाराज हे भारतीय इतिहासातील सर्वात महान आणि प्रभावशाली शासकांपैकी एक होते. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांचे योगदान आणि शौर्य आठवले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांचा मृत्यू ३ एप्रिल १६८० रोजी रायगड किल्ल्यावर झाला. शिवाजी महाराजांचे निधन एक नैतिक धक्का म्हणून इतिहासात नोंदवले जाते, आणि त्यांच्या मृत्यूचे कारण विविध दृष्टीकोनातून समजले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांचा मृत्यू कसा झाला? शिवाजी महाराजांचा मृत्यू प्रकृती अस्वास्थ्यामुळे झाला असे काही इतिहासकारांचे मत आहे. दुसरीकडे, काही लोकांचा असा विश्वास आहे की शिवाजी महाराजांच्या राण्या आणि मंत्री यांनी त्यांना विष दिले होते, त्यामुळे रक्ताच्या उलट्या होऊन शिवाजी महाराजांचा मृत्यू झाला. तरी यामागे काय सत्य आहे हे स्पष्टपणे सांगता येत नाही.

शिवाजी महाराजांबद्दल काही महत्त्वाचे तथ्य आणि महान कामगिरी: जन्म: शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर झाला. ते शहाजी भोसले आणि जिजाबाई यांचे पुत्र होते.

**स्वराज्याची स्थापना:**
शिवाजी महाराजांनी भारतीय उपखंडात स्वराज्याची कल्पना केली. मुघल आणि इतर परदेशी आक्रमकांपासून मुक्त असलेले स्वतंत्र हिंदवी राज्य स्थापन करणे हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट होते. त्यांनी "स्वराज्य" चे तत्व मांडले आणि स्थापित केले.

किल्ल्यांचे बुरुज बांधणे आणि मजबूत करणे:
शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रातील विविध डोंगरी किल्ल्यांवर गड आणि किल्ले बांधले, जे लष्करी रणनीतीसाठी वापरले जात होते. यातील प्रमुख किल्ले - रायगड, सिंहगड, दुर्गादिव, पुरंदर आणि तोरणा.

**छत्रपती शिवाजी महाराजांचा मृत्यू कसा झाला?**
**नौदलाची स्थापना:** भारताच्या किनारपट्टीचे रक्षण करण्यासाठी शिवाजी महाराजांनी एक मजबूत नौदल निर्माण केले. त्यांनी मराठा साम्राज्याच्या किनारी भागांवर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी नौदल दलांची स्थापना केली, जे भारतीय समुद्रात ब्रिटिश, पोर्तुगीज आणि इतर युरोपीय शक्तींचा सामना करण्यास सक्षम होते.

**उत्कृष्ट लष्करी रणनीती:** शिवाजी महाराजांची लष्करी रणनीती अद्वितीय होती. त्यांनी छोट्या तुकड्यांसह जलद हल्ले केले आणि शत्रूला आश्चर्यचकित करण्यासाठी गनिमी कावा तंत्रांचा वापर केला. त्याने युद्धभूमीवर अनेक वेळा मुघलांना पराभूत केले आणि आपले शौर्य सिद्ध केले.

**महसूल आणि प्रशासन:**
शिवाजी महाराजांनी त्यांच्या शासनाची कार्यक्षम प्रशासकीय रचना स्थापन केली. त्यांनी सम्राटांच्या मताप्रमाणे महसूल धोरण आखले आणि सामान्य लोकांच्या कल्याणासाठी अनेक सुधारणा केल्या. त्यांनी विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश असलेली मंत्रिपरिषद (अष्ट प्रधान) स्थापन केली.

**धार्मिक सहिष्णुता:** शिवाजी महाराजांनी त्यांच्या शासनव्यवस्थेत धार्मिक सहिष्णुतेला प्रोत्साहन दिले. तो एक वीर हिंदू राजा होता, पण तो मुस्लिम आणि इतर धर्मांबद्दल आदर दाखवत असे. त्याने मशिदी आणि मंदिरे बांधण्यास परवानगी दिली आणि त्याच्या राज्यात वेगवेगळ्या धर्मांना समान अधिकार दिले.

**इतिहासातील स्थान:**
स्वातंत्र्यलढ्यातील अग्रणी नेते म्हणून भारतीय इतिहासात छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव नेहमीच लक्षात ठेवले जाईल. त्यांचा संघर्ष आणि संघर्षाचे धोरण भारतीय स्वातंत्र्यलढ्यासाठी प्रेरणास्त्रोत म्हणून उदयास आले.

**राजवाड्याचे बांधकाम:**
शिवाजी महाराजांनी रायगड किल्ल्याला आपला मुख्य किल्ला बनवले आणि तिथे एक भव्य राजवाडा बांधला, जिथे त्यांचे प्रशासकीय कामकाज आणि दरबार चालत असे.

शिवाजी महाराजांची महानता त्यांच्या अद्वितीय नेतृत्व, दूरदृष्टी, संघर्ष आणि प्रशासकीय क्षमतेमध्ये होती. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या योगदानाचे स्मरण करणे हा त्यांच्या संघर्षांचा आणि विजयांचा एक चिरस्थायी वारसा आहे.
छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथीनिमित्त
विनम्र अभिवादन...!

## लाभार्थी मार्च महिन्याच्या धान्यापासून वंचित, हमालांच्या संपाचा फटका

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

**नवीन पनवेल** : हमालानी पुकारलेल्या संपामुळे मार्च महिन्याचे रेशनिंगचे धान्य लाभार्थ्यांना मिळालेले नाही. त्यामुळे पनवेलचे लाभार्थी संताप व्यक्त करत आहेत. मार्च महिन्यापासून हमालानी संप पुकारला आहे. त्यामुळे पनवेल मधील रेशनिंग दुकानात धान्य पोहोच झालेले नाही. धान्य मिळाले नसल्याने काही लाभार्थ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. विशेष म्हणजे दुकानात धान्य आलेले नसताना देखील काही रेशनिंग दुकानदारांनी लाभार्थ्यांचे थंब घेतलेले आहेत. धान्य दिल्यानंतर रेशनिंग दुकानदाराने लाभार्थ्याचे थंब घेणे क्रमप्राप्त आहे. मात्र धान्य दुकानात आले नसताना देखील धान्य मिळाल्याचा थंब घेण्यात आलेला आहे. त्यामुळे रेशनिंग दुकानदारांचा सावळा गोंधळ सुरूच आहे. मोफत धान्य असताना काही ठिकाणी धान्य घेताना लाभार्थ्यांकडून १० रुपये फी आकारणी केली जाते. बहुतांशी रेशनिंग दुकानात तक्रार वही उपलब्ध नाही. याकडे पुरवठा अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन कारवाई करणे गरजेचे आहे.

पनवेल तालुक्यात आणि शहरात 199 रेशनिंगची दुकाने आहेत. जवळपास 80 हजार प्राधान्य आणि अंत्योदयचे रेशन कार्डधारक आहेत. मार्च महिन्यातील धान्य आलेले नसल्याने रेशनिंग दुकानदार आणि लाभार्थी बुचकळ्यात पडले आहेत. एप्रिल महिना उजाडला तरी देखील मार्च महिन्यातील धान्य आलेले नाही. त्यामुळे हमालांच्या संपाचा फटका सर्वसामान्य लाभार्थ्यांना बसत आहे. त्यामुळे हा संप लवकरात लवकर मिटावा अशी आशा लाभार्थी घेऊन बसले आहेत. धान्य आल्यानंतर रेशन दुकानदारांनी मार्च आणि एप्रिल या दोन महिन्याचे धान्य लाभार्थ्यांना द्यावे. मार्च महिन्यातील धान्य आलेले नसल्याने थंब घेण्याच्या सूचना दिलेल्या नाहीत. -अश्विनी धनवे, पुरवठा अधिकारी, पनवेल

# मोत्यांच्या अक्षरांचे केंद्र ठरतेय भवरवाडीची जि.प. प्राथमिक शाळा ता.आष्टी जि.बीड

## उत्कृष्ट कलाकृती,सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन एक वेगळा ठसा शाळेने उमटविला

## जूनी इमारत झाल्याने विद्यार्थी जिव धोक्यात घालून शिक्षण घेतात

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी।**
**मारुती सत्रे**

तालुक्यातील जि. प. प्रा.शाळा भवरवाडी या शाळेत पहिली ते चौथी या चार वर्गात ३० विद्यार्थी आहेत.




येथे मुख्याध्यापक सुनिल काकडे तर सहशिक्षक म्हणून अनिल बेद्रे आहेत. अनिल बेद्रे हे शैक्षणिक गुणवत्ता वाढीबरोबर सर्व विद्यार्थ्यांचे सुंदर हस्ताक्षर होण्यासाठी विशेष परिश्रम घेतात. शाळेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक् गुणवत्ता चांगली आहे. या शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांचे सुंदर हस्ताक्षर आहे. शाळेतील विद्याथ्यर्थ्यांचे पाठांतर, पाढे पाठांतर, इंग्रजी वाचन चांगले आहे. प्राथमिक शिक्षण दर्जेदार मिळत आहे. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी कलेग्राफी साठी ३०० रु. किंमतीचे पेन सरपंच भरत भवर यांनी दिले आहेत. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रविण भवर, संतोष भवर यांचेही शाळेसाठी योगदान असते. येथे ५५ ते ६० वर्षापूर्वीची जुनाट अशी दोन खोल्यांची शाळेची इमारत आहे. ही इमारत विद्यार्थ्यांना बसण्यायोग्य नाही. येथे इमारत होणे गरजेचे आहे. शाळेतील विद्यार्थ्यांचा दरवर्षी सांस्कृतिक कार्यक्रम साजरा केला जातो. १०० ते १२५ घरे असलेली भवरवाडी आहे, मात्र जागरुक पालकांमुळे प्राथमिक शाळेत दर्जेदार ज्ञानदानाचे कार्य शिक्षक करत आहेत. ग्रामस्थांचा लोक सहभाग व शाळेला मदत करण्याची भूमीका असल्याने विविध शैक्षणिक उपक्रम, कार्यक्रम राचविले जातात. पालक, ग्रामस्थांच्या सहभागातून शाळेत नुकतीच शिवजयंती साजरी झाली. यानिमित्ताने तीन तासांचा सांस्कृतिक कार्यक्रम झाला. यावेळी पालक व ग्रामस्थांनी सढळ हाताने विद्यार्थ्यांना बक्षीसे दिली. ४० हजार रु. जमले आहेत. सरपंच ज्या शाळा खोलीत शिकले ती इमारत आता नादुरुस्त झाल्याने येथे शासनाने निधी मंजूर करून दोन खोल्या स्लबच्या (आरसीसीच्या) बांधण्यात याव्यात अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. मुख्याध्यापक सुनिल काकडे हे ९ वर्षापासून या शाळेत आहेत ते अनिल बेद्रे सर हे दोन वर्षापासून येथे कार्यरत आहेत. भवरवाडीची प्राथमिक शाळा ही मोत्यांच्या अक्षराची शाळा असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सुंदर हस्ताक्षरासाठी विशेष परिश्रम दोन्ही ही शिक्षकांनी विद्याथ्यर्थ्यांचे हस्ताक्षर सुधारण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. अधिकचा एक तास दिल्याने सर्वच विद्यार्थ्यांचे जवळपास हस्ताक्षर सुंदर झाले. सांस्कृतिक कार्यक्रमात अव्वल भवरवाडी येथील जिल्हा परिषदेची शाळा ही तशी छोटी आहे.पण गुणवत्ते बरोबरच सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये ही उत्स्फूर्त भाग घेतात. याचाच परिपाक म्हणून दरवर्षी होणारे स्नेहसंमेलन हे त्यांच्या कलागुणांची सादरीकरणातील उत्कृष्ट कलाकृती होत असून सांस्कृतिक कार्यक्रमाचा एक वेगळा ठसा या परिसरात या शाळेने उमटविलेला आहे. गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव यांच्या मार्गदर्शनाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भवरवाडी या शाळेत मिशन जरेवडी अंतर्गत वाचन लेखन उपक्रमांतर्गत विद्यार्थी घडावेत या दृष्टीने सुंदर हस्ताक्षर उपक्रम राबवण्यात येत आहे. आज भवरवडी शाळेत मुलांचे अक्षर खूप सुंदर मोत्यासारखे झाले आहेत. या शाळेसाठी सरपंच भरत भवर, ग्रा पं सदस्य रमेश भवर, हनुमंत मोरे,गणपत भवर,जालिंदर भवर,ज्ञानदेव बागल, पोपट भवर, सदाशिव भवर, विठ्ठल शिनगिरे, बबन भवर, वैजनाथ भवर, रामा भवर, संतोष मोरे, संतोष भवर,बन्सी भवर, प्रशांत भवर, महेश भवर व आदी ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.

## जल जिवन मिशन अंतर्गत कामाची चौकशी करा:- विजयराव पौळ माजी पंचायत समिती सदस्य

**पान १ वरुन** आमदार भावनाताई गवळी, मा. गुलाबराव पाटील, इत्यादी लोकप्रतिनिधींना देण्यात आल्या असून प्रशासकीय स्तरावर जिल्हाधिकारी वाशिम, मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. वाशिम, तहसीलदार रिसोड, गट विकास अधिकारी पं. स. रिसोड, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग वाशिम, जीवन प्राधिकरण अधिकारी वाशिम, इत्यादींना निवेदन देण्यात आले परंतु अद्याप पर्यंत संबंधित विभागावर याचा कोणताही परिणाम झाला नसून जल जीवन मिशन विभाग अद्यापही झोपेचे सोंग घेत असून गावकऱ्यांना मात्र पाण्यासाठी झोप येत नाही रात्री अपरात्री पाण्यासाठी बाहेर जावे लागते उन्हामध्ये मोटरसायकलवर अनेक किलोमीटर वरून पाणी आणावे लागते हे गावकऱ्याचे दुर्दैव पाणीपुरवठा विभागाने लवकर जागी होऊन गावकऱ्यांना पाणीपुरवठा करून दिलासा द्यावा अशी मागणी विजयराव पौळ यांनी केली आहे.

# दुचाकी ला लटकवलेल्या बॅगमधून ५०,०००/- रुपये लंपास

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ प्रतिनिधी**
**:-जितेंद्र खोडे**

राळेगावः-दिनांक ०२एप्रिल २०२५ रोजी संध्याकाळी सुमारे ५ वाजताच्या सुमारास भिमराव देवरावजी कांबळे (वय 45, व्यवसाय शेती, रा. आष्टा, ता. राळेगाव, जि. यवतमाळ) यांनी मध्यवर्ती बँक, राळेगाव येथून आपल्या खात्यातून ५०,०००/- रुपये काढले. हे पैसे त्यांनी आपल्या बॅगेत ठेवून बँकेतून बाहेर आले व मोटारसायकल (स्प्लेंडर, क्रं. MH 29 AF 7968) च्या हॅंडलला लटकवले. त्यानंतर, सायं. ०५:३० वाजण्याच्या सुमारास ते क्रांती चौकातील पुरोहित बिकानेर दुकानासमोर पोहोचले. गाडी उभी करून त्यांनी दुकानातून नाश्ता घेतला व गणेश चहा कॅन्टीन येथे चहा पिण्यासाठी थांबले. चहा घेतल्यानंतर ते आपल्या गावी आष्टा येथे परतले. घरी पोहोचल्यावर बॅग उघडून पाहिल्यावर त्यांना पैशांचा अभाव आढळला. त्यानंतर त्यांना आठवले की, पैसे चोरीला गेल्याची शक्यता बिकानेर दुकानासमोर गाडी उभी असताना किंवा चहा घेत असताना झाली असावी. अज्ञात इसमाने त्यांच्या बॅगेतून ५०,०००/- रुपये चोरल्याचा अंदाज असून यासंदर्भात त्यांनी तात्काळ तक्रार दाखल केली आहे. या घटनेमुळे परिसरात चिंता व्यक्त केली जात असून पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## आयरिस कलेक्शनची अभिजातता आणि शानदारपणाचा अनोखा मेळ

**पान १ वरुन** क्लासिक लक्झरी आणि आधुनिकचा यांची आवड असणाऱ्यांसाठी खास तयार करण्यात आलेला आयरिस कलेक्शनचा हा मास्टरपीस सुसंस्कृतपणा, अभिजातता व आधुनिक स्त्री-तत्वाची योग्य अभिव्यक्ती आहे. झेन डायमंडच्या आयरिस कलेक्शन मधील अनोखे ब्रेसलेट नाजूक, ड्युएल स्टोन डिझाइनमध्ये तयार करण्यात आले आहे. डायमंड क्लस्टर आणि नैसर्गिक एमरल्ड अक्सेंटची त्याला जोड देण्यात आली आहे. व्हाइट गोल्डमध्ये तयार करण्यात आलेले हे ब्रेसलेट हिऱ्यांनी जडवलेल्या बँडने सुशोभित करण्यात आले आहे. आधुनिक व उच्चभ्रूपणाचे प्रतीक असलेले हे ब्रेसलेट कालातीत अभिव्यक्ती साठी योग्य आहे.

झेन डायमंडच्या आयरिस कलेक्शनमधील आयरिस इयररिंग्ज आधुनिक कारागिरीचा उत्कृष्ट नमुना आहे. याच्या डिझाइनमधील चमकदार सफायर गोल्ड बेझेलमध्ये बसवण्यात आला असून त्याला शुभ्र हिऱ्यांची जोड देण्यात आली आहे. स्लीक, व्हाइट गोल्ड कनेक्टरसह यातले पेयर आकाराचे हिरे नाजूक व्हाइड गोल्ड प्रेममध्ये बसवण्यात आले आहे.

## अभिनेत्री क्रांती रेडकर यांच्या उपस्थितीत हिरकणी ग्लॅमर अवॉर्ड शो

**पान १ वरुन** स्किन, हेअरकट यासंबंधी नव्या तंत्रज्ञान आणि ट्रेड्सवर चर्चा केली आणि उपस्थित व्यावसायिकांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमामध्ये बॅकस्टेज मेकअप व ब्रायडल मेकअप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमुळे कार्यक्रमात एक वेगळाच रंग भरला. कार्यक्रमाच्या शेवटी पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. ज्यामध्ये सिनेअभिनेत्री क्रांती रेडकर यांनी विजेत्यांना तसेच गणमान्य व्यावसायिकांचा ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव केला. त्यांनी स्पर्धक व आयोजन टीम चे भरभरून कौतुक केले व असे कार्यक्रम स्थानिक प्रतिभांना एक व्यासपीठ देऊन त्यांच्या सुप्त गुणांना व सक्षमीकरनात महत्वाचे योगदान देतात असे मत व्यक्त केले तसेच त्यांच्या सत्कार व आदरातिथ्य बाबत व्यवस्थापनाचे आभार मानले. कार्यक्रमाला प्रीतम गुप्ता ,दिपालीताई रंगारी,अमित रंगारी ,सुजाता जांभूळकर ,सन्मान रंगारी ,अदीप रंगारी ,पलक गोटे,एजल सोनटक्के ,कनक सोनटक्के ,रितेश सोनटक्के,राहुल डेविड ,लक्ष्मी डेविड यांचे मोलाचे सहकार्य लाभले .

# एकमेव जगप्रसिद्ध प्रथम छत्रपती !!

**(छ.शिवाजी महाराज स्मृतिदिन विशेष.)**

_छ.शिवाजी महाराजांबद्दल पंडित नेहरू आपल्या डिस्कवरी ऑफ इंडिया- भारताचा शोध या ग्रंथात म्हणतात, "छत्रपती शिवाजी प्रतिहल्ला करणाऱ्या हिंदू राष्ट्रवादाचे प्रतीक होते. जुन्या इतिहासातून त्यांनी प्रेरणा मिळविली. महाराज अत्यंत धैर्यशील आणि उत्कृष्ट नेतृत्वगुण असणारे नेते होते. त्यांनी स्वराज्यासाठी चिवटपणे लढणारा गट म्हणून मराठी जनांना एकत्र केले. त्यांच्यामागे राष्ट्रीयत्वाची पार्श्वभूमी उभी केली आणि या गटास अशी चेतना दिली, की या गटाशी धडका घेत मुघल साम्राज्य अखेर मोडकळीस आले. छत्रपतींचा मृत्यू १६८०मध्ये झाला तरी त्यांच्यानंतर संपूर्ण भारतावर प्रभुत्व प्रस्थापित होईपर्यंत मराठ्यांचा राज्यविस्तार होतच राहिला." रयतेच्या या जाणत्या छत्रपतींच्या प्रेरक स्मृती जागविणारा श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी- अलककार यांचा हा लेख... संपादक._

छत्रपती शिवाजीराजे भोसले हे मराठा साम्राज्याचे संस्थापक होते. भोसले कुळातील या राजाने विजापूरच्या आदिलशाही आणि मोगल साम्राज्य यांच्याविरुद्ध संघर्ष करून मराठा स्वराज्य स्थापन केले. रायगड ही राजधानी असलेले स्वतंत्र मराठा राज्य त्यांनी उभे केले आणि इ.स. १६७४ मध्ये छत्रपती म्हणून राज्याभिषेक करवून घेतला. शिस्तबद्ध लष्कर व सुसंघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर छ.शिवरायांनी एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्य उभे केले. भौगोलिक ज्ञानाचा उपयोग करून आश्चर्यजनक वेगवान हालचालीने बलाढ्य शत्रूंचे मनोधैर्य खचविले. नेमके हल्ले यांचा वापर करून गनिमी काव्याचे तंत्र त्यांनी यशस्वीपणे वापरले. आपल्या वडिलांकडून मिळालेल्या दोन हजार सैनिकांच्या छोट्या तुकडीपासून एक लाख सैनिकांचे लष्कर छत्रपतींनी उभे केले. किनारी आणि अंतर्गत प्रदेशातील किल्ल्यांची डागडुजी करण्यासोबतच अनेक किल्लेही त्यांनी उभारले. राज्य कारभारात मराठी भाषेचा वापर करण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले. अख्ख्या महाराष्ट्रात ते शिवाजीराजा, शिवाजीराजे, शिवबा, शिवबाराजे, शिवराय अशा अनेक नावांनी ओळखले जातात. शिवाजी महाराजांचा जन्मदिवस हा शिवजयंती म्हणून साजरा होतो. छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे पुत्र छत्रपती संभाजी महाराज यांचा संयुक्त उल्लेख शिवशंभू असा होतो. सर्वच इतिहासकार सर्वसाधारणपणे शिवाजी महाराजांचा जन्म वर्ष १६३० ते औरंगजेबाचा मृत्यू वर्ष १७०७ यादरम्यानच्या ७७ वर्षांच्या काळास शिवकाल असे म्हणतात.

पुणे जिल्ह्यातील जुन्नर शहरानजीक वसलेल्या शिवनेरी या डोंगरी किल्ल्यावर दि.१९ फेब्रुवारी १६३०मध्ये छत्रपती शिवरायांचा जन्म झाला. एका आख्यायिकेनुसार शिवनेरी गडावरील शिवाई देवीला जिजामातेंनी आपल्याला बलवान पुत्र व्हावा, अशी प्रार्थना केली होती. म्हणून या मुलाचे नाव शिवाजी ठेवले गेले. शिवबांच्या जन्माच्या वेळी दख्खनमधील राजसत्ता ही विजापूर, अहमदनगर व गोवळकोंडा या तीन मुसलमानी सल्तनतींमध्ये विभागली होती. शहाजीराजांनी आपली निष्ठा वेळोवेळी अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही आणि मुघल यांच्यादरम्यान बदलली; पण त्यांनी पुणे ही नेहमीच आपली जहागिरी ठेवली व स्वतःची एक लहानशी फौज पदरी बाळगली होती. इ.स.१६४७मध्ये सतरा वर्षांच्या शिवरायांनी आदिलशहाच्या ताब्यातला तोरणगड जिंकला आणि स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. तोरणगड हेच स्वराज्याचे तोरण ठरले. त्याच साली त्यांनी कोंढाणा- सिंहगड आणि पुरंदर हे किल्ले आदिलशहाकडून जिंकून पुणे प्रांतावर पूर्ण नियंत्रण मिळवले. या शिवाय तोरणगडासमोरील मुरुंबदेवाचा डोंगर जिंकून त्याची डागडुजी केली. त्याचे नवे नाव त्यांनी राजगड असे ठेवले. राजे जेव्हा पुण्याचा कारभार पाहू लागले, तेव्हा त्यांनी स्वतःची स्वतंत्र राजमुद्रा तयार केली. ही राजमुद्रा संस्कृत भाषेत होती. तिचा मराठी अर्थ- ज्याप्रमाणे प्रतिपदेचा चंद्र वाढत जातो, आणि साऱ्या विश्वात वंदनीय होतो, तशीच शहाजींचा पुत्र शिवाजींची ही मुद्रा व तिचा लौकिक वाढत जाईल. होतही गेले तसेच! एकेक किल्ले जिंकत राहिल्यामुळे इ.स.१६५९ साली आदिलशहाने दरबारात शिवाजी महाराजांना संपविण्याचा विडा ठेवला. हा विडा दरबारी असलेल्या अफझलखान नावाच्या सरदाराने उचलला. मोठ्या सैन्यासह आणि लवाजम्यासह तो मोहिमेवर निघाला. अफझलखान वाईजवळ आला, तेव्हा शिवाजीराजांनी सद्याच्या महाबळेश्वरजवळ असलेल्या प्रतापगडावरून त्यास तोंड देण्याचे ठरवले. तहाची बोलणी सुरू झाली आणि अंतिम बोलणीसाठी शिवाजी महाराजांनी स्वतः यावे, असा खानचा आग्रह होता. पण राजेंचे वकिल- पंताजी गोपीनाथ बोकील यांनी खानाला गळ घालून प्रतापगडावरच भेट घेण्यास बोलावले. भेटीच्या नियमांनुसार दोन्ही पक्षांकडील मोजकीच माणसे भेटीसाठी येतील, दरम्यान सर्वांनी निःशस्त्र राहण्याचे ठरले. शिवाजीराजांना खानच्या दगाबाजपणाची कल्पना असल्यामुळे त्यांनी सावधगिरी म्हणून चिलखत चढविले. सोबत बिचवा तसेच वाघनखे ठेवली. बिचवा चिलखतामध्ये दडविला होता, तर वाघनखे हाताच्या पंजाच्या आतमध्ये वळविलेली असल्यामुळे दिसत नव्हती. महाराजांसोबत जिवा महाला हा विश्वासू सरदार होता, तर अफझलखानसोबत सय्यद बंडा हा तत्कालीन प्रख्यात असा दांडपट्टेबाज होता. प्रताप गडावरील एका छावणीत भेट ठरली. भेटीच्या वेळी उंचपुऱ्या, बलदंड खानाने छत्रपतींना मिठी मारली. राजांचे प्राण कंठाशी आले, त्याच वेळी खानने कट्यारीचा वार महाराजांवर केला, परंतु चिलखतामुळे राजे बचावले. अफझलखानाचा दगा पाहून शिवाजीराजांनी वाघनखे खानाच्या पोटात खुपसली. त्याचबरोबर खानाची प्राणांतिक आरोळी चहूकडे गुंजली. सय्यद बंडाने तत्क्षणी राजांवर दांडपट्ट्याचा जोरदार वार केला, जो तत्पर जिवा महालाने स्वतःवर झेलून शिवाजीराजांचे प्राण वाचले. यामुळेच "होता जिवा म्हणून वाचला शिवा" ही म्हण प्रचलित झाली. आधीच ठरलेल्या इशाऱ्याप्रमाणे भेटीच्या वेळी तीन तोफांचे बार प्रतापगडावरून काढण्यात आले. खानाच्या छावणी जवळपासच्या झाडाझुडुपांमध्ये दडून बसलेल्या मावळ्यांनी हल्ला करून खानाच्या सैन्याची दाणादाण उडविली. खानाचा मुलगा फाजलखान आणि इतर काही सरदार लपूनछपून वाईच्या मुख्य छावणीपर्यंत आले. इथे खानाचा जनाना होता. ते पाठलागावर असलेल्या नेताजीच्या सैन्यापासून वाचण्यासाठी खजिना, हत्ती व इतर जड सामान टाकून विजापूरला जनान्यासकट पळाले. खानाच्या मृत्यूनंतर त्यांनी त्याच्या शवाचे अंत्यसंस्कार इस्लामी पद्धतीने केले. त्याची एक कबर प्रतापगडाच्या पायथ्याशी बांधली आणि त्या कबरीच्या कायम देखभालीची व्यवस्था केली. अफजलखानाच्या मृत्यूनंतर शिवाजीराजांनी दोरोजी नावाच्या सरदाराला कोकण पट्टीतील आणखी किल्ले आणि प्रदेश जिंकण्यास पाठवले. स्वतः राजे सातारा प्रांतात घुसून कोल्हापुरापर्यंत गेले व त्यांनी पन्हाळा जिंकून घेतला. नेताजीने त्याच्या सैन्यासह जवळपास विजापुरापर्यंत धडक मारली. आधुनिक काळात अफझलखानच्या मृत्यूचा हा दिवस शिवप्रताप दिन म्हणून साजरा केला जातो. प्रकृती खालावत गेल्याने रायगडावर हनुमान जन्मोत्सवाच्या वेळी वयाच्या अवघ्या ५०व्या वर्षी दि.३ एप्रिल १६८० रोजी छ.शिवाजी महाराज मृत्युमुखी पडले. त्यांच्याबरोबर त्यांच्या चौथ्या पत्नी महाराणी पुतळाबाई सती गेल्या. एक उत्तम प्रशासक, उत्तम रयतेचे वाली, हिंदवी स्वराज्य संस्थापक, मराठा साम्राज्य संस्था विस्तारक, शक्तिशाली, निष्ठावान, शूरवीर, मावळ्यांची प्रेरणाशक्ती, जाज्वल्य पराक्रमाने इतिहास रचणारे राजे दृष्टीआड झाले होते. छ.शिवाजी महाराजांचे नाव प्रत्येक भारतीयांच्या हृदयमंदिरात असे सुवर्णाक्षरांनी कोरले गेले, की ते आजतागायत अधिकच झळाळून चमकू लागले आहे, हे सांगणे न लगेच!

! छत्रपती शिवरायांच्या अनेक अविस्मरणीय स्मृतींना मानाचा लवून मुजरा !!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी..**
**मु. पो. ता. जि. गडचिरोली**

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

द•ख•ल



प्रतिनिधी :- मयुर प्रकाश धुरी "स्वामी समर्थ" प्रगट दिना निम्मित दादर येथील स्वामीच्या मठामध्ये भाविकांच्या दर्शनासाठी लांबच लांब रांगा.

## 'सारंग महाजन अमरावती विभागीय अध्यक्षपदी नियुक्त'..

**. दैनिक युवक वार्ताहर**
**प्रतिनिधी - किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई**



अमरावती, दि. 30 मार्च 2025 – राष्ट्रीय युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या अमरावती विभागीय अध्यक्षपदी श्री. सारंग प्रमोद महाजन यांची निवड करण्यात आली आहे.
ही नियुक्ती संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. गणेश कचकलवार यांच्या आदेशाने आणि पश्चिम महाराष्ट्र सचिव श्री. संतोष लांडे यांच्या शिफारशीनुसार करण्यात आली. नियुक्तीनंतर श्री. सारंग महाजन यांनी युवा ग्रामीण पत्रकार संघाचे आभार मानले आणि संघाच्या उद्दिष्टांसाठी तत्परतेने कार्य करण्याचे आश्वासन दिले. त्यांच्या निवडीमुळे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील अनेक मान्यवरांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## खारघरमध्ये अनधिकृत सहा मजली इमारतीवर सिडकोची कारवाई

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर) :**



खारघरमध्ये अनधिकृत सहा माजली इमारतीवर सिडकोने तोडकी कारवाई केली आहे. खारघर येथील सिडकोच्या जागेवर बांधलेल्या एका अनधिकृत सहा मजली इमारतीवर सिडकोने तोडक कारवाई केली.खारघरच्या सेक्टर ५ मधील हिल व्ह्यू अपार्टमेंट या भल्या मोठ्या इमारतीवर सिडकोने आज अगदी सकाळीच तोडक कारवाई केली. त्यामुळे इमारतीच्या फ्लॅटमध्ये राहणारे रहिवाशी रस्त्यावर आले.

## मायेची सावली एक हात कर्तव्याचा या संस्थेतर्फे संचालक श्री.दौलत बेल्हेकर यांचा वाढदिवस साजरा

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर )..**

सामाजिक, आरोग्य आणि शैक्षणिक, पर्यावरण आदी क्षेत्रात कार्यरत असलेल्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे प्रणित मायेची सावली एक हात कर्तव्याचा या संस्थेतर्फे परिवारातील संचालक श्री.दौलत बेल्हेकर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.वाढदिवसाच्या निमित्त शुभेच्छा शिवभक्त संजय दत्तात्रय भालेराव तसेच मायेची सावली एक हात कर्तव्याचा पदाधिकारी शिवसैनिक संस्थापक अध्यक्ष यशवंत खोपकर, सचिव संदीप चांदिवडे, सल्लागार मेघा सावंत, कार्यालय प्रमुख वसंत घडशी, खजिनदार अक्षदा खोपकर, अपूर्वा ताई यांनी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.यावेळी संस्था पदाधिकारी, सदस्य आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# अल्पवयीन मुलीची रस्त्यात अडवणुक करत छेड काढल्याप्रकरणी एकास तीन वर्ष सक्तमजुरी

**युवक आधार निफाड**
**प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

घराकडे परतणाऱ्या अल्पवयीन मुलीची छेड काढल्याच्या आरोपात संदिप कारभारी गायकवाड रा. औरंगपुर, ता.निफाड यांस निफाडचे जिल्हा व सत्र न्यायाधीश मा.बी.डी.पवार यांनी दोषी ठरवत तीन वर्ष सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे. दि.६ डिसेंबर २०२० रोजी सायंकाळी ७ वा सुमारास १३ वर्षीय पिडीत मुलगी आपल्या नातेवाईक अल्पवयीन मुलीसोबत औरंगपुर ते हिवरगांव रस्त्याने स्कुटीवर बेघर वस्तीकडे परतत होत्या. त्यावेळी संदिप कारभारी गायकवाड याने रस्त्यात गाडी अडवुन पिडितेचा हात पकडुन अश्लील भाषेत बोलत छेडछाड केली होती. याबाबत पिडितेने सायखेडा पोलिस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीवरुन, भा.दं. वि.कलम ३५४ ए, ३४१,बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ८ व १२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता. तपासानंतर निफाडचे जिल्हा व सत्र न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले. या खटल्यात सरकारी अभियोक्ता अड.सुषमा बंगले यांनी पिडित, तपास अधिकारी घनश्याम तांबे यांचेसह एकुण सहा साक्षीदारांची साक्ष नोंदवुन प्रभावी युक्तीवाद केला. कोर्ट पैरवी अधिकारी म्हणुन म.पो.शि.निकिता सानप यांनी काम पाहिले. न्यायालयासमोर आलेल्या साक्षीपुराव्यात आरोपी संदिप कारभारी गायकवाड याचेवरील आरोप सिध्द झाले. न्यायालयाने भा.दं.वि.कलम ३५४ ए अन्वये तीन वर्ष सक्तमजुरी व ५ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास ३ महिने कारावास, बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ८ अन्वये ३ वर्ष सक्तमजुरी व ५ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास ३ महिने कारावास, बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम १२ अन्वये २ वर्ष सक्तमजुरी व १ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास १ महिना साधा कारावास, भा.दं.वि कलम ३४१ अन्वये १
महिना साधा कारावास व ५०० रुपये दंड, दंड न भरल्यास ७ दिवस साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.



## मुरुड शहरातील पुलाची दुरावस्था अनेक वर्षे स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष.!

**दैनिक युवक आधार**

**मुरुड प्रतिनिधी :-** मुरुड शहरातील छल्लाणी दवाखाना शेजारील पुल तुटून अनेक वर्ष झाले तरीही मागील सत्ताधाऱ्यांनी कधीही या रस्त्याच्या मधोमध असलेला पूलाकडे पाहिले नाही काहीतरी परिवर्तन निर्माण करण्यासाठी मुरुड शहरातील नागरिकांनी परिवर्तन घडवून आणले तरीही याकडे स्थानिक स्वराज संस्थेला जाग येईना मुख्य बाजारपेठेतील हा रस्ता बंद झाला आहे त्यामुळे बाजारदिवशी महिलांना त्या ठिकाणाहून जाता येईना तसेच त्या भागातून विद्यार्थीही मोठ्या संख्येने जातात त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच रात्रीच्या वेळी वाहनधारकांना तो खड्डा दिसतही नाही त्यामुळे अनेक अपघात होऊनही प्रशासन मात्र कानाडोळा करत आहे वार्ड क्रमांक चार मध्ये भागातील नागरिकाकडून अनेक वेळा प्रशासनाला विनंती करूनही त्याकडे दुर्लक्ष करताना दिसून येत आहेत त्याबद्दल कसल्याही प्रकारचे उत्तर प्राप्त होत नाही. अशी चर्चा नागरिकात होत आहे . सध्या स्थितीतील ग्रामपंचायत सरपंच,उपसरपंच,सदस्य व त्यांचे पती यांनी तरी या पुलाकडे पहावे व ते दुरुस्त करण्याचे प्रस्ताव सदरील ग्रामसभेमध्ये किंवा मासिक मीटिंगमध्ये मांडावे अशी मागणी वार्ड क्रमांक चार मधील नागरिक करत आहेत. त्या ठिकाणी अपघात होऊन शारीरिक इजा होण्याची वाट पाहत आहे का ? असं प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे लवकरात लवकर दुरुस्ती करून देण्याची मागणी या भागातील व्यापारी, नागरिक, विद्यार्थी करत आहेत. अशा चर्चेला ऊत येत आहे.

"त्या पुलावर अनेक छोटे-मोठे अपघात होत आहेत मात्र प्रशासन जीवित हानी होण्याची वाट पाहत आहे का अशी चर्चा वाहनधारकाकडून होत आहे"






## मेळघाटातील लहान मुलांच्या पोटाला (डंबा ) डागण्या देण्याच्या अघोरी प्रथेविरुद्ध धडक मोहीम

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर : ज्योत्सना करवाडे**
**अमरावती**

मेळघाटातील अतिशय दुर्गम भाग, रस्ते खराब, जेवणाची गैरसोय, खुप धडपड करून मिळणारं एक वेळ चे जेवण .
सोबत भेळ, बिस्किटे यांचाच पोटाला आधार. ८/१० गावे ओलांडून कुठे तरी राखाद्या ठिकाणी मिळणारा चहा मिळतो. मोबाईलला रेंज मिळते, कुठे मिळतच नाही. संपर्क करायला अनंत अडचणी. या सर्व अडचणी वर मात करित, तहान, भूक सर्व विसरून काम करणारे *नंदिनी जाधव, भगवान राणदिवे, श्रीकृष्ण धोटे* हे महाराष्ट्र अंनिस चे कार्यकर्ते. १७ मार्च पासून मेळघाटातील आदिवासींच्या प्रबोधनासाठी सुरू झालेल्या मोहिमेतील सहभागी कार्यकर्त्यांचा हा रोजचा दिनक्रम. आतापर्यंत ४० गावात प्रबोधनाचे कार्यक्रम झाले आहेत. ३ कार्यक्रम शाळेत, ३ कार्यक्रम गावात असे रोज ६/७ कार्यक्रम सुरु आहेत.

सकाळी ७ ला बाहेर पडले की रात्री ११ वाजताच रूम वर परत येणार.
असं खुप धावपळीचं प्रचंड दगदग सहन करून प्रबोधनाची ही चळवळ आपले अंनिस साथी राबावित आहेत. यांचं जेवढं कौतुक करावं तेवढं कमीच आहे. "आदिवासी भागातील लोकांपर्यंत पोहचणे खुप महत्वाचे आहे. आतापर्यत असे कार्यक्रम त्यांच्या गावात झाले नाही. आदिवासी भागातील लोक खुप चांगले प्रामाणिक आहेत. आदिवासी भागातील लोकांच्या पर्यंत पोहचणे खुप गरजेचे शाळेतील प्रत्येक मुलाला डंबा दिलेला आहे . घरातील आजी, आजोबा, क्वचितच एखादा भगत डंबा (डागण्या ) देतो. पण त्यांना समजावून सांगितले की, ते लोक ऐकतात. लोकांना वाटते आम्ही शासनाची माणसे आहोत, त्यामुळे तिथल्या सर्व अडचणी आपल्याला सांगतात. दिवसा,रात्री



दारू पिलेले लोक कार्यक्रमात असतात. पण दारू पिवून गैरवर्तन मात्र आतापर्यत कोणत्याच व्यक्तीने केलेले आढळले नाहीत " असा हा या अंनिस साथींनी सांगितलेला आतापर्यंतचा अनुभव.
७ एप्रिल ला प्रबोधनाचा हा पहिला टप्पा पूर्ण होईल.
साथी आपल्या कार्याला मनःपूर्वक सलाम..!
विवेकाचा आवाज बुलंद करूया...!
प्रा प्रवीण देशमुख
राज्य कार्यकारिणी सदस्य
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

# कुंडेगावात संत तुकोबाराय गाथा(बाळक्रीडा) संगीत पारायण सोहळा मोठ्या भक्तीभावात संपन्न !!

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

उरण तालुक्यातील कुंडेगावात संत तुकोबाराय गाथा (बाळक्रीडा) संगीत पारायण सोहळा सद्गुरु ह.भ.प.गजानन महाराज ठाकुर(बेलपाडा) व ह.भ.प.अनुबाई घरत तसेच ह.भ.प.धर्मा महाराज यांच्या शुभाशिर्वादाने आणि श्री गणेश हनुमान यांच्या कृपेने ग्रामस्थ मंडळ कुंडेगाव व बेलपाडा ते देवाची आळंदी पायी दिंडी यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूवर्य ह.भ.प.गजानन महाराज ठाकुर(बेलपाडा) यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर चैत्र शु. १ रविवार दि.३०/०३/२०२५ ते मंगळवार चैत्र शु तृतीया दि.०१/०४/२०२५ पर्यंत या पारायण सोहळ्याचे आयोजन ह.भ.प.दिपक महाराज भोईर व ह.भ.प.रेवती दिपक भोईर,ह.भ.प.कु. विश्राम दिपक भोईर यांच्या वतीने आयोजित करण्यात आले असून सकाळी कळश पूजन,श्री गणेश मुर्ती पूजन श्री हनुमान मुर्ती पूजन,विणा पूजन,दिप प्रज्वलन,संत तुकोबाराय मुर्ती पूजन,संत तुकाराम गाथा ग्रंथ पूजन ग्रामस्थ मंडळ कुंडेगाव यांच्या हस्ते करून सकाळी ५ ते ७ वाजता गुरूवर्य ह.भ.प.गजानन महाराज ठाकुर(बेलपाडा) यांच्या मार्गदर्शनाखाली ह.भ.प.धर्मा हरि कोळी,ह.भ.प. वत्सला गजानन ठाकुर,गिता गोवर्धन कडू,गिता मनोज ठाकुर,वर्षा रोशन ठाकुर,कल्पना प्रसाद कडू,प्रिती नरेंद्र कडू,निर्मला रमेश कडू,दिपा यचित म्हात्रे,ह.भ.प.निरा शरद कोळी,ह.भ.प.रसिका भास्कर कोळी,ह.भ.प.शशिकला सुरेश कोळी,ह.भ.प.मंजुळा कृष्णा भगत,ह.भ.प.निशादा हरिदास कोळी,ग्रामस्थ मंडळ कुंडेगाव व श्री गणेश हनुमान हरिपाठ मंडळ कुंडेगाव यांच्या सहकार्यांने संत तुकोबाराय गाथा बाळ क्रिडा पारायण व्यासपीठ चालक ह.भ.प.बाळकृष्ण महाराज भगत(गव्हाण),ह.भ.प.मनोज महाराज ठाकुर(बेलपाडा) यांचे संत तुकोबाराय बाळ क्रिडा संगित गाथा पारायण सकाळी ०९ ते १२ तर भजन सेवा दुपारी १ ते ३ तसेच सायंकाळी प्रवचन ४ ते ५ वाजता होऊन सायंकाळी ५ ते ६ सामुदायिक हरिपाठ झाल्या नंतर रात्री ८ ते १० किर्तन होऊन रात्री १० नंतर जागर भजन झाले. चैत्र शु.प्रतिपदा गुढीपाडवा रविवार दि.३०/०३/२०२५ रोजी श्री कृष्ण महिला भजन मंडळ बेलपाडा गायीका गिता ठाकुर,सात्विका कडू,वर्षा ठाकुर,करूणा कडू आणि सहकारी वादक ह.भ.प.अनंता महाराज पांचाल,अलंकार रमेश कडू यांचे सुमधुर भजन होऊन ह.भ.प. नरेंद्र महाराज कडू (बेलपाडा) श्री कृष्ण दिंडीचे अध्यक्ष यांचे प्रवचन ४ ते ५ वाजता होऊन ह.भ.प. रोशन महाराज ठाकुर(बेलपाडा) यांचे रात्री ८ ते १० वजता किर्तन झाले. त्याच प्रमाणे दुस-या दिवशी म्हणजे चैत्र शु.२ सोमवार दि.३१/०३/२०२५ रोजी दुपारी १-०० वाजता हौशी भजन मंडळ कुंडेगाव याचे भजन होऊन दुपारी ३-०० वाजता कुंडेगाव नगरीत पायी दिंडी नगर प्रदक्षिणा ह.भ.प.गणेश महाराज फुलकुंठवार(भिवंडी) सौजन्य कै.भगवान सोमा पाटील यांच्या स्मर्णार्थ प्रशांत भगवान पाटील(उरण) तर रात्री १० -०० वाजता संत ज्ञानोबा,तुकोबा पालखी सोहळा संपन्न झाल्या नंतर तिस-या दिवशी चैत्र शु.३ मंगळवार दि.०१/०४/२०२५ रोजी ठिक १० ते १ वाजता ह.भ.प.मनोज महाराज (बेलपाडा) यांचे काल्याचे किर्तन पंचक्रोशीतील सर्व आदरनिय वारकरी, गुणीजन, गायक, वादक,टालकरी श्रोतेजन आणि भाविक तसेच पंचक्रोशीतील माठ्या संख्येने उपस्थीत भाविकांच्या उपस्थीतीत संपन्न झाला. यावेळी संपुर्ण कुंडेगाव नगरी हरीनामाने दुमदुमूनली होती.





# रेवदंडा ग्रामसेवकाचा अनधिकृत अजब कारभार ?

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**





रेवदंडा ग्रामसेवकाचा अनधिकृत असेसमेंटचा धडाका ग्रामस्थांना अंधारात ठेवून ग्रामस्थांची फसवणूक करून काम केलीत, बंद दाराआड काय गुपित लपलय ? त्यांचे साथीदार कोण ? ह्या मागे रेवदंडा बायपास रोडवर महाराष्ट्र शासनाच्या जागेवर कांदळवणावर अनधिकृत खुलेआम बांधकाम चालु होतं त्याच्यावर सामाजिक कार्यकर्ते प्रशांत वरसोलकर यांनी लेखी विरोध केला असताना तसेच रेवदंडा ग्रामस्थांचा पण विरोध असताना कांदळवन तोडू नका व सरकारी जागेवर अनधिकृत बांधकाम करू नका अशी ग्रामसेवक समीर म्हात्रे यांना सांगितले होते तरी पण त्यांनी काम न थांबवता अनधिकृत समाजहॉलच बांधकाम कोणालाही रायगड जिल्हा परिषद वरिष्ठ अधिकारी, पंचायत समिती गट विकास अधिकारी, कांदळवन अधिकारी रायगड जिल्हाधिकारी तसेच महाराष्ट्र सरकारलाही न घाबरता चालुच ठेवलं . मी कोणालाही घाबरत नाही काय करायचे ते करू शकता असे बिनधास्त सांगत समाजहॉल पूर्ण बांधून दिला. पूर्वपरंपरेनुसार ग्रामपंचायतच्या रजिस्टर मध्ये अगोदरच दोन चार ओळी सोडून ठेवल्या अचानक मीटिंग घेऊन सूचक अनुमोदक तयार करून असेसमेंटला ग्रामस्थांचा विरोध असताना आपली मनमानी करत ग्रामसेवक समीर म्हात्रे यांनी असेसमेंट दिला अशी उदंड ग्रामस्थांमध्ये सर्वत्र चर्चा होत आहे तसेच ग्रामपंचायत चे रजिस्टर मध्ये त्याची लेखी नोंद आहे एवढ्या घाईघाई ने का असेसमेट दिला ? अशी ग्रामस्थानमध्ये जोरदार चर्चा सुरू आहे. अशी अनधिकृत काम बरीच त्यांनी केली आहेत,कुठल्या राजकीय पुढाऱ्याच ह्या ग्रामसेवकावर वरदहस्त आहे अशी रेवदंडा ग्रामस्थांमध्ये जोरदार चर्चा आहे . तसेच ग्रामस्थांमध्ये अशी चर्चा होत आहे की रेवदंडा बायपास वर नव्यानी जे रोड किंवा ब्रीजच काम होणार आहे त्यामध्ये ही समाज हॉलची जागा ही महाराष्ट्र सरकारची जागा जाणार आहे डबल चौपट किंमत मिळवून पैसे खाण्याचा घाट दिसून येत आहे अशी सर्वत्र चर्चा सुरू आहे ह्या ग्रामसेवकांची सरकारी खातेनिहाय चौकशी करण्यात यावी अशी जनतेची मागणी जोर धरू लागली आहे.

रेवदंडा ग्रामसेवकांनी रेवदंडा ग्रामस्थांचा विरोध असताना अनधिकृत काम केली असतील तर त्या कामाची सरकारी चौकशी होणार

**हंसराज कोकार्डे**
**गटविकास अधिकारी**
**अलिबाग पंचायत समिती**

रेवदंडा महाराष्ट्र शासनाच्या जागेवर कांदळवन वृक्षतोड करून अनधिकृत बांधकाम झालं असेल तर त्याची चौकशी करून सरकारी कारवाई करण्यात येईल

**अशोक शिंदे**
**कांदळवन सरकारी अधिकारी**

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या अध्यक्षपदी अशोक ठोके तर सचिव पदी रवी इंगळे यांची निवड...

**दैनिक युवक आधार**
**परतूर- जालना (अशोक ठोके)**



प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी भारतरत्न, बोधिसत्व
परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 134 वी जयंती परतूर रेल्वे स्टेशन येथे साजरी करण्यात येणार आहे, महामानवाची जयंती थाटामाटात
साजरी करण्याच्या अनुषंगाने परतूर रेल्वे स्टेशन येथे आर.सी. सी. मित्र मंडळ व पंचशील मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने साजरी करण्याच्याअनुषंगाने दिनांक 1 एप्रिल 2025, वार मंगळवार रोजी जयंती कार्यकारीनी निवडीची बैठक पार पडली. या बैठकीत दैनिक युवक आधार चे जालना जिल्हा प्रतिनिधी अशोक ठोके यांची अध्यक्षपदी तर सचिव पदी रवी इंगळे व उपाध्यक्षपदी वंचित बहुजन आघाडीचे परतूर शहर अध्यक्ष राहुल नाटकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.त्यांच्या निवडीने परिसरातील आंबेडकरी अनुयायांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.या जयंती उत्सव समितीची पुढीलप्रमाणे कार्यकारिणी निवडण्यात आली आहे.
अध्यक्ष:- आयु. अशोक ठोके
उपाध्यक्ष : आयु.राहुल नाटकर
सचिव :- आयु. रवि इंगळे
कोषाध्यक्ष :आयु.दिपक हिवाळे
सहसचिव :- आयु.प्रदीप साळवे
संघटक:आयु. स्वप्नील पहाडे
सहकोषाध्यक्ष :आयु केतन खंदारे.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीची बैठक यशस्वी पार पडावी म्हणून विकास वेडेकर, नितीन खरात व रमेश कदम यांनी सहकार्य केले.

## कॉलेजच्या बेंचवर बसण्याच्या कारणावरून दोघा विद्यार्थ्यांना मारहाण

**दैनिक युवक आधार**

**पनवेल दि. ०२ (वार्ताहर)** : कॉलेजच्या बेंचवर बसण्याच्या कारणावरून झालेल्या वादाचा राग मनात धरून आपापसात संगनमत करून दोघा जणांनी फिर्यादी बिधवान गुरुंग (वय २१, रा इंडियाबुल्स) व त्याचा मित्र यश श्रीवास्तव यांना शिवीगाळ करत लाथा बुक्क्याने मारहाण केल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. आरोपी तुषार राजू सिंग व खुशाल शेरीगर यांनी कॉलेजच्या बेंचवर बसण्याच्या कारणावरून झालेल्या वादाचा राग मनात धरून आपापसात संगनमत करून बिधवान गुरुंग (वय २१, रा इंडियाबुल्स) व त्याचा मित्र यश श्रीवास्तव यांना शिवीगाळ करत लाथा बुक्क्याने मारहाण केली. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## राजापूर तालुकास्तरीय प्रज्ञा शोध परीक्षेत जि.प. शाळा ताम्हाणे नं १ पहिलीवाडीची विद्यार्थिनी प्रसिध्दी चव्हाण हिचे उज्वल यश

**दैनिक युवक आधार**
**सुरेश भोईर (कार्यकारी संपादक)**

राजापूर दि.२४ मार्च २०२५ रोजी राजापूर येथे झालेल्या तालुकास्तरीय प्रज्ञा शोध परीक्षेत जि. प. शाळा ताम्हाणे नं-२ पहिलीवाडी या शाळेतील विद्यार्थिनी प्रसिद्धी मधुकर चव्हाण हिने प्रथम क्रमांक पटकावून पूर्ण तालुक्यात आपल्या शाळेची व गावाची मान अभिमानाने उंचावली आहे. . विशेष म्हणजे ती सामान्य



कुटुंबातील व हलाखीच्या परिस्थितीशी झुंज देत हे यश संपादन केले आहे. तिचे हे यश परिसरातील सर्व मुलींना प्रेरणादायी ठरेल. तिच्या यशात
मुख्याध्यापक श्री. महादेव थोलबरे,
श्री. विनायक साळुंखे
श्री. अमोल गोडवे, श्री. उदयकुमार नाईक व श्रीम. रेणुका नलगे सरांचा महत्वाचा वाटा आहे तिने मिळवलेल्या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री. संतोष चव्हाण व उपाध्यक्ष श्री.अशोक सावंत व सर्व समिती, माता पालक, शिक्षक पालक संघ, सर्व ग्रामस्थ व मुंबईकर मंडळी, तुळसवडे केंद्रातील सर्व शिक्षक यांनी तिचे, तिच्या आई वडिलांचे व तिला मार्गदर्शन करणाऱ्या गुरुजींचे तसेच अभिनंदन केले आहे.

# जि. प प्राथमिक शाळा झुल्लर येथे शैक्षणिक शिक्षण परिषद

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ प्रतिनिधी:**
**-जितेंद्र खोडे**

राळेगाव:- शैक्षणिक सत्र माहे मार्च मधील खैरी केंद्रातील शिक्षण परिषद जिल्हा परिषद प्राथमिक शाळा झुल्लर ,पंचायत समिती राळेगाव येथे दिनांक २८- ०३ -२०२५ रोज शुक्रवारला वेळ १० ते २ या वेळेत पार पडली . ही शिक्षण परिषद चे अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष बावणे तर प्रमुख पाहुणे म्हणून गटशिक्षणाधिकारी पं . स . राळेगाव राजू काकडे, खुशाल वानखेडे अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती केंद्र शाळा खैरी, सुरेश कुंभलकर केंद्रप्रमुख तथा मुख्याध्यापक केंद्र शाळा खैरी , देऊळकर सर




उच्च श्रेणी मुख्याध्यापक दहेगाव त्यांच्या उपस्थितीत मंगेश कोवळे सहायक शिक्षक मंगी , वेट्टी मॅडम पिंपरी शाळा यांचे मार्गदर्शनात पार पडली. या कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक खैरी केंद्राचे केंद्र प्रमुख तसेच खैरी शाळेचे मुख्याध्यापक श्री सुरेश कुंभलकर सर यांनी केले शिक्षण परिषद मध्ये सकाळी १०.०० ते १०.३० उपस्थिती नोंदणी तासिका पहिली १०.३० ते ११.०० स्पर्धा परीक्षा पूर्व तयारी मार्गदर्शन कु. वेट्टी मॅडम पिंपरी शाळा तासिका दुसरी -११ ते ११.४५ निपुण महाराष्ट्र जी. आर. वाचन व कृती कार्यक्रम अध्ययन स्तर निश्चिती मार्गदर्शन श्री कोवळे सर. प्राथमिकशाळा, मंगी तासिका तिसरी वेळ ११.४५ते १२.३०SQAAF मानके भरणे व शाळा पूर्व तयारी उन्हाळी वर्ग सुरू करणे तसेच चौथ्या तासिकेत वेळ १२.४५ ते १.३० प्रशासकिय माहिती कुंभलकर सर यांनी दिली
१.३० ते २.०० वाजेपर्यंत खैरी केंद्रातील पिंपरी या शाळेचे तीन विद्यार्थी नवोदय परीक्षेमध्ये प्राविण्य प्राप्त केले त्यांचा सत्कार गटशिक्षणाधिकारी राजू काकडे खैरी केंद्र शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष खुशाल वानखेडे यांचे हस्ते करण्यात आला. तसेच सेवानिवृत्त शिक्षक श्री दिलीप मांदाडे व चिंतामण धाडवे सर यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला. या शिक्षण परिषदेला खैरी केंद्रातील सर्व जिल्हा परिषद शाळांचे मुख्याध्यापक तसा शिक्षक वृंद उपस्थित होते या शिक्षण परिषदेच्या यशस्वीतेसाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा झुल्लर च्या प्रभारी मुख्याध्यापिका रजनी वानखेडे (भगत)मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले . या शिक्षण परिषदेचे आभार प्रदर्शन केंद्रप्रमुख कुंभलकर सर यांनी केले

## धारणगांव खडक ता. निफाड येथे मेन लाईन शॉट सर्किटमुळे दोन ते तीन झोपड्या जळून खाक

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**धारणगाव खडक:-** धरणगाव खडक येथील अकरावड ह्या ठिकाणी दुपार च्या सुमारास आगीत 2/3झोपड्या जळुन राख झाल्या ..श्री. बापु चंद्रभान माळी श्री.नंदु गंगाराम सोनवणे ह्यांच्या घरातील धान्य ,किराणा भांडे तसेच कागदपत्रे,मोटसायकल , फवारणी चे पंप ,दागिने तसेच इत्यादी साहित्य पुर्णता जळुन गेल्याने सदर कुटुंबाचे संसार उघड्यावर पडले आहेत .फक्त अंगावर असलेल्या कपड्यांव्यतिरिक्त कुठलाही आधार नाही.शासकीय पंचनामा केलेला असुन मा.तलाठी, ग्रामविकास आधिकारी, महावितरण सहाय्यता अभियंता गोसावी मॅडम यांनी पंचनामा केला व तसेच जळीत झोपड्यांच्या पंचनामा कामी पोलीस हवालदार कांदाळकर व पोलीस हवालदार सानप, पोलिस पाटील हजर होते तसेच गावातील काही ग्रामस्थांनी तात्काळ मदत म्हणुन आपापल्या परीने कुणी पाचशे कुणी हजार कोणी दोनशे... जशी शक्य होईल तशी तात्पुरत्या स्वरुपात मदत केलेली आहे परंतु सदर कुटुबांना आपल्या ग्रामस्थ स्तरावर मदतीची गरज आहे ..जे कुणीही इच्छुक असतील त्यांनी आपआपल्या परीने मदतीचा हात ह्या कुटुंबास द्यावा..असे अवाहन माणुसकीच्या नात्याने करण्यात येत आहे...वेळ कुणावरही येते मात्र माणुसकीचा आपला किंचित सा प्रयत्न ही कोलमडलेल्या उभा करण्यास सहाय्य ठरतो..इच्छुक व्यक्तींनी मदतीसाठी ग्रामपंचायत कर्मचारी मा.गिते ह्यांच्याशी संपर्क करावा.अथवा त्यांच्या फो नंबर वर फोन पे करावा..मा.विजय गिते 9665034306




## मराठा सेवा संघ वाशिम नवीन कार्यालयात जिजाऊ रथयात्रा नियोजन पूर्वतयारी बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**
**रिसोड वार्ताहर**
**रणजीत सिंह ठाकुर**
**दिनांक 18 ते 19 एप्रिल**

या दोन दिवसात जिजाऊ रथयात्रा वाशिम जिल्ह्यात येत असून हृदयात्रेच्या स्वागतासाठी स्थळ निश्चिती ,स्वागत स्थळ , सभास्थळ, सकाळचा नाश्ता व दुपारचे जेवण,रात्रीचा मुक्काम व जेवण, आदीबाबत चर्चा झाली व उद्यापासून मंगरूळपीर कारंजा रिसोड मालेगाव या ठिकाणी जिल्हा कार्यकारिणीचे प्रमुख पदाधिकारी बैठकीस उपस्थित राहतील तालुका पदाधिकाऱ्यांनी स्थळ निश्चित करून बैठकीचे आयोजन करावे त्यानंतर पुढील नियोजन करण्यात येईल.. सभेचे अध्यक्ष मराठा सेवा संघ जिल्हाध्यक्ष नारायणराव काळबांडे व प्रमुख मार्गदर्शक म्हणून विभागीय अध्यक्ष अशोकराव महाले सर , प्रबोधन कक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रा भारत आव्हाळे सर ,संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष गजाननराव भोयर , प्रमुख उपस्थिती मध्ये , जिल्हा सचिव डॉक्टर विजय काळे,जिल्हाध्यक्ष गणेश सुर्वे,बुलढाणा जिल्हाध्यक्ष प्रा.योगेश्वर निकस, विभागीय कार्याध्यक्ष अनिल मोरे, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष सविता ताई मोरे विभागीय सचिव सविताताई बोरकर , कार्याध्यक्ष अनिताताई कोरडे,संभाजी ब्रिगेड जिल्हा उपाध्यक्ष




# प्रतिभेला शिक्षणाच्या कुबड्यांची आवश्यकता नसते - संमेलनाध्यक्ष प्राचार्य एन . बी. चापे

**दैनिक युवक आधार**

**सिंदखेडराजा:** मराठीच नव्हे तर कुठल्याही भाषेतील साहित्य व साहित्यिकांची ऐतिहासिक परंपरा जर पाहीली तसेच अनेक संस्थांमार्फत बहुजन साहित्य संमेलनासारखी छोटी - मोठी मराठी साहित्य संमेलने वर्षभर वेगवेगळ्या ठिकाणी पार पडत असल्याचे आताशा आपण नेहमीच पाहत असताना अशा संमेलनातील साहित्यिकांना ऐकून इतर विविध व्यवसाय करणारे अनेक लोक साहित्यिक झाले आहेत हेही आपण सर्व जाणून आहोत. त्या सर्वांचे अवलोकन करताना एवढे निश्चित म्हणता येईल की प्रतिभेला शिक्षणाच्या कुबड्यांची आवश्यकता नसते ! असे प्रतिपादन दि. ३१ - ०३ - २०२५ रोजी महाराष्ट्रंच नाही तर महाराष्ट्राबाहेरही विविध राज्यात ख्यातनाम बहुजन साहित्य संघ, चिखलीच्या वतीने मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरीतील राजे लखुजी जाधव साहित्य नगरी, मातोश्री मंगल कार्यालय येथे धूमधडाक्यात संपन्न झालेल्या बहुजन साहित्य संमेलनामधे संमेलनाध्यक्ष प्राचार्य एन्. बी .चापे यांनी आपल्या भाषणातून केले. सहावे बहुजन साहित्य संमेलन सिंदखेडराजा तेथे ३१ मार्च ला मोठ्या उत्साहात पार पडले, त्यावेळी ते अध्यक्ष पदावरुन बोलत होते. तत्पुर्वी सकाळी ९ वाजता राजमाता जिजाऊंच्या जन्मस्थळावर त्यांच्या पुतळ्याला विविध प्रांत तथा जिल्ह्यातून आवर्जून उपस्थित झालेल्या साहित्यिक कवी आणि लेखक व रसिक माता भगिनींना सर्व मान्यवर मंडळींनी पुष्प हार अर्पण करून तथा छत्रपती शिवबांना मुजरा करणाऱ्या गीताच्या गजरात, महाराष्ट्र राज्याच्या संस्थापने दरम्यानच्या काळात पुरोगामीत्व तथा प्रगतीशीलतेचा व राष्ट्रीयतेचा नवाच वारसा निर्माण करणारे तत्कालीन फुले - आंबेडकरी विचारांचे, देशातील पहिले आदर्श गाव म्हणून राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त मौजे सावरगाव डुकरे, ता. चिखली, जि. बुलढाणा येथील पुरोगामी विचारांचा वारसा बोधप्रद भजनी मंडळाच्या द्वारे जपणाऱ्या शाहीर विजय डुकरे पाटील त्यांच्या बरोबरीने हे प्रबोधन कार्य आपल्या मधूर आवाजामधून पुढे चालविणारी त्यांची अर्धांगिनी सौ. अलका विजय डुकरे पाटील या मां जिजाऊंच्या लेकीने सुशोभित पाटावर संविधान ग्रंथ आपल्या डोक्यावर घेऊन गायन करीत संविधान दिंडीला सुरुवात करण्यात आली. यावेळी बहुजन साहित्य संघाचे हरहुन्नरी कलावंत अध्यक्ष डॉ. विजयकुमार कस्तुरे यांच्या " दिंडी निघाली - दिंडी निघाली sss संविधान ग्रंथाची दिंडी निघाली " या गिताने परीसर दुमदुमुन गेला होता. या दिंडीमध्ये झेप साहित्य चळवळीचे संस्थापक अध्यक्ष डी. एन्. जाधव आणि विधिज्ञ डॉ. विजयकुमार कस्तुरे यांच्या तसेच डॉ. कस्तुरे व त्यांच्या वकील व कवयित्री पत्नी रेखाताई हणमंते यांच्या आणि स्कॉटलंड यार्ड स्टुडंट्स ब्रॅंड अम्बेसेडर डॉ. संघर्ष सावळे यांच्या व डॉ. कस्तुरे अशा विविध जोड्यांनी गीताच्या तालावर खेळलेल्या फुगडीने वेगळीच रंगत आणली. राजे लखुजी जाधव साहित्य नगरीत पोहचल्या नंतर डॉ . कस्तुरे यांनी काढलेल्या चित्रप्रदर्शनीचे उदघाटन कवयित्री राजकन्या पायके यांनी केले तर रांगोळी प्रदर्शनीचे उदघाटन विधिज्ञ रेखाताई हणमंते यांच्या हस्ते महिलांच्या उपस्थितीत करण्यात आले. त्या नंतर राजमाता जिजाऊ , छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीराव फूले, छत्रपती राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुजन करुन सिंदखेडराजा नगरीचे उपविभागीय अधिकारी तथा महाराष्ट्राच्या तळागाळातील व विकासाच्या वाटा पासून वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच विशेषतः भटक्या पारधी समाजातील आबालवृद्धांना संवैधानिक सर्वांगीण विकासाच्या गंगेत सामील करून घेण्याचा वसा बालपणापासून उचलणारे मा. संजय खडसे यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. पुढे बोलताना प्रा. चापे म्हणाले की, साहित्य हा समाजाचा आरसा असतो व



साहित्यिक हा लोकशिक्षक असतो. आपल्या मराठी भाषेतील साहित्य इतर भाषेतही अनुवादित व प्रकाशित झाले आहे. बहुजन साहित्य संमेलनाचे संयोजक विधिज्ञ डॉ. विजयकुमार कस्तुरे यांच्यासह सर्व पदाधिकारी यांच्या कार्याचे भाषणातून त्यांनी कौतुक केले. सुरवातीला बहुजन साहित्य संघाचे उपाध्यक्ष डॉ. बबनराव महामुने यांनी संमेलनाची भूमिका विषद केली. मावळते संमेलनाध्यक्ष व सुप्रसिद्ध समीक्षक मा. किरण डोंगरदिवे, झेप संपादक डी. एन्. जाधव, उपविभागीय अधिकारी मां. संजय खडसे यांची समयोचित भाषणे झाली. उदघाटन सत्रात, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या वयोवृध्द भीम शाहीर आयुष्मान पांडूरंग अवसरमोल तथा या चळवळीत त्यांना चिरंतन साथ देणारी त्यांची पत्नी सौ. जनाबाई अवसरमोल, मा. शिवा माळोदे, मा. सुशीलकुमार खरात, त्यांचे बालपणापासूनच प्रबोधनाचा वसा उचलणारे अल्पवयीन चिरंजीव वंश खरात, लहानपणीच फुले- आंबेडकरी विचारांचा आपल्या गायक वादक वडीलांचा वारसा चालविणाऱ्या बाल कलावंत जय दत्तात्रय राऊत, शाहीर विजय डुकरे पाटील व त्यांची पत्नी सौ. अलका विजय डुकरे पाटील, अडाणी असतांनाही लोकशाहीर वामनदादा कर्डक यांच्या गीत गायनाचा व प्रबोधनाचा वसा पुढे चालविणारे तथा डोळ्याने अधू असणारे शाहीर भाऊराव साळवे, चिखली, अगदी अडीच ते तीन वर्षांचाच असताना मराठी व हिंदी चित्रपटात आपल्या आई डॉ. रेणू जोशी प्रमाणेच अभिनय कौशल्य दाखवणारा बाल कलाकार अभिनय श्रीपाद जोशी, साहित्यिक चळवळ चालवणाऱ्या ज्येष्ठ कवयित्री मा. कल्पना निंबोकार, सामाजिक कार्यास वाहून घेतलेले मा. हृदयनाथ हिवराळे, छत्रपती संभाजीनगर, बालपणापासून काव्यासक्ती असणाऱ्या तथा अल्पवयातच प्रकाशन संस्था चालवणाऱ्या मा. रविना पवार पाटील, धुळे, सामाजिक तथा साहित्यिक क्षेत्रात सर्वांच्या सुखदुःखाची दखल घेणारे मा. प्राचार्य चापे सर, फुले - आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ साहित्यिक प्रा. शिवाजी वाठोरे, सिल्लोड, पुरोगामी वैचारिक वारसा जपणारे प्राचार्य ज्ञानेश्वर गोरे, देऊळगाव राजा, अंदाजे चाळीस ते पंचेचाळीस वर्षांपूर्वी बुलढाणा जिल्ह्यातील प्रसिद्ध परीसरात घडलेल्या विकलांग व मनोरुग्ण तरूणीच्या सामूहिक बलात्कार व निर्घृण खून प्रकरणास आपल्या आक्रमक व संघर्षशील महिला सुरक्षा समितीच्या माध्यमातून वाचा फोडून मृत पिडीतेस मरणोत्तर न्याय मिळवून देणाऱ्या डॉ.प्रभाताई चिंचोले, बुलढाणा तसेच त्याच प्रकरणात व त्यांच्या बरोबरीने सातत्याने महिला सुरक्षा समितीच्या चिखली च्या तत्कालीन अध्यक्षा डॉ. कुसुमताई देशमुख, महिला उद्धारक चळवळीतील खंदे व्यक्तिमत्व सौ. आशाताई घाटगे, मागणी, चिखली, खान्देशी व मराठी काव्य गायनातून प्रबोधन करणारे मा. भीमराव सोनवणे, एरंडोल, हॉटेलचा व्यवसाय करीत असतांनाही मुळचा सहृदयी काव्यपिंड जपत पुरोगामी विचारांशी कायमची नाळ असलेले मा. संजय सोनुने, फर्दापूर, छोटीमोठी प्रासंगिक नोकरी करीत मिळणाऱ्या तुटपुंज्या पगारातूनही साहित्य संमेलने भरवण्यात प्रथम क्रमांकावर असलेला तरूण मा. योगेश ताटे, औसा, पत्रकारितेद्वारे जन हितरक्षा जपणारे मा . नितीन ढाकणे, वकीली व्यवसाय सांभाळीत साहित्यिक संमेलन अखंड चालवणारे मा. अड. शंकर कदम, परभणी, वाडवडीलांपासून पारंपारिक चालत आलेली सांस्कृतिक नाळ जोपासत वैचारिक वाटचाल करणारे स्मशानजोगी मा. गणेश रामा शेनुरे, चिखली, मातृतीर्थ सिंदखेडराजा येथील व्यवसायी पण मनापासून औदार्य जपत गोरगरीबांच्या सामाजिक, कौटुंबिक कार्यास सदा तत्पर असणारे आणि मातृतीर्थातील या पहिल्या ऐतिहासिक अविस्मरणीय बहुजन साहित्य संमेलन सोहळ्यासाठी आपले सुंदर, सुशोभित व नयनरम्य सृष्टिसौंदर्याने नटलेले मातोश्री मंगल कार्यालय मोफत उपलब्ध करून देणारे मा. शिवप्रसाद उर्फ शिवाभाऊ ठाकरे, घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असतांनाही पारंपारिक तबलापेटी दुरूस्ती सह विविध जातीधर्माच्या गरीब व झोपडपट्टीत राहणाऱ्या एकता नगरच्या सर्वधर्मीय समभाव चळवळीस वाहून घेतलेले मा. विश्वनाथ बावस्कर, चिखली, तीन दशकांपासून साहित्यिक व सामाजिक प्रबोधन करणारे मा. माणिकराव गोडसे, नाशिक , कंडक्टर म्हणून नोकरी करताना अलीकडेच बसचे ब्रेक्स फेल झाल्याचे चालकाने सांगताच गच्च भरलेल्या बसमधील सर्व प्रवाशांना आपल्या जीवाची पर्वा न करता बसच्या मागील भागात नेवून, बसच्या झालेल्या अपघातामधून साऱ्यांचे जीव स्वतः जखमी होऊन सुद्धा वाचविणाऱ्या झुंजार ज्येष्ठ कवयित्री मा. यशोदा पांढरे, जळगाव, सर्वांचे सामाजिक भान व जाण जपणारे सूर्यभान शिंदे, मलकापूर, पोलिस विभागाची कर्तव्यकठोर नोकरी करतांनाही समाजाचे देणे लागतो या भावनेने कार्य करणारे मा. एकनाथराव पाडळे, छत्रपती संभाजीनगर, प्रवचन व भजन कीर्तनातून प्रबोधन करणाऱ्या मा. कवयित्री मा. शीला शिवरकर, कारंजा लाड, सामाजिक व शैक्षणिक कार्यास वाहीलेले मा. राहूल पवार, चिखली इ. मान्यवरांना फुले - शाहू - आंबेडकर या राज्यस्तरीय पुरस्कारांनी मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले. तसेच या संमेलनाचे आगळेवेगळे वैशिष्ट्य म्हणजे संमेलनात उपस्थित साहित्यिक व मान्यवर महिलांना मां जिजाऊंच्या माहेर नगरी मधून येवला नवूवारी पैठणींची सप्रेम भेट देवून संमेलनाच्या विशेष अतिथी सिने अभिनेत्री डॉ. रेणू जोशी, पि. इ. एस्. ( औरंगाबाद ) छत्रपती संभाजीनगर चे माजी प्राचार्य डॉ. हिंमतराव जाधव, अड. रेखाताई हणमंते, डॉ. संघर्ष सावळे, प्राचार्य चापे सर, दाभाडे साहेब, डॉ. नंदीनी रिंढे, डॉ. सावली राऊत, प्रा. भास्कर इंगळे, मा. किरण डोंगरदिवे सर, मा. डी. एन्. जाधव, मा. कडूबा बनसोड, डॉ. बबनराव महामुने, डॉ. खरात, प्रा. काटोले इ. मान्यवरांच्या हस्ते शाल, स्मृतिचिन्ह, सन्मान चिन्ह व पुष्पगुच्छ प्रदान करून सर्वांना सन्मानित करण्यात आले. दुपारच्या सत्रात चिखली येथील पंचशील भजनी मंडळाच्या कलावंत, गायक, वादक सदाशिव फुलझाडे, दत्ता राऊत, साहेबराव बोर्डे, सुशीलकुमार खरात व त्यांचे चिरंजीव वंश खरात, विजय डुकरे पाटील व डॉ. कस्तुरे इ. च्या बेटी बचाव, बेटी पढाव संदर्भातील मराठी व इंग्रजी गीत गायनाचा सांस्कृतिक कार्यक्रम आणि निमंत्रित कवींचे कविसंमेलन मां. डॉ . सुनील पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. याप्रसंगी मा. सुधीर शेरे सर, डोंबीवली यांच्या ओव्या दिनांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले.या संमेलनाच्या संपन्नतेमधे पूर्वनियोजित अध्यक्ष सुप्रसिद्ध गझलकार डॉ. गणेश गायकवाड, बुलढाणा यांचा सिंहाचा वाटा असून मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरीचे उदारहृदयी व कार्यकर्तुत्ववान आमदार मां. मनोज कायंदे यांच्या व त्यांच्या सहकार्यशील मित्रमंडळी व कार्यकर्त्यांचे बहुमुल्य सहकार्य लाभल्याने उपस्थित सर्व मान्यवर रसिक प्रेक्षकांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन करून आभार मानले. बहुजन साहित्य संमेलन यशस्वी करण्यासाठी ब. सा. सं. चे उपाध्यक्ष डॉ. बबनराव महामुने, सचिव डॉ. डी. व्ही. खरात, तथा प्रा. शालीनी काटोले, अड. रेखाताई हणमंते, भाव कवी अंकुश पडघान, दैनिक लोकनेता चे तरूण संपादक ज्ञानेश्वर बुधवत, संजय सोनकांबळे, विशाल जायभाये, वरद जायभाये, ज्येष्ठ कवी व सामाजिक कार्यकर्ते गजानन दराडे, केंद्रीय मानवाधिकार संगठन, नई दिल्ली चे विशेष उपाध्यक्ष मा. रविंद्र सोनार, फोटोग्राफर विठ्ठल सपकाळ, कवयित्री अड. वर्षा कंकाळ, केंद्रीय मानवाधिकार चे संदीप शिंदे, पवन शर्मा तथा मनोज शर्मा बंधू, अड. देवराव वानखेडे, चिखली तथा सर्व मित्रमंडळी व बऱ्याच ऊदारहृदयी नागरिकांनी मोलाचे सहकार्य केले. या देखण्या बहुजन साहित्य संमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन संयोजक विधिज्ञ डॉ. विजयकुमार कस्तुरे यांनी केले तर आभार प्रदर्शन. डॉ. खरात यांनी केले. यावेळी छत्रपती संभाजीनगर, जळगांव, पुणे , लातूर, अमरावती, नागपूर, धुळे, नाशिक, नगर, ठाणे, मुंबई या सह अनेक जिल्ह्यातील साहित्यिक, समीक्षक विचारवंत आणि रसिकांनी मोठ्या संख्येने साहित्य संमेलनात हजेरी लावली हे विशेष ! त्यामुळे हे संमेलन खऱ्या अर्थाने " बहुजन" साहित्य संमेलन ठरले असे म्हणावे लागेल.

# *आपटा कोळीवाडा ते श्रीक्षेत्र एकविरा कार्ला पालखी सोहळ्याचे रसायनी मोहोपाडा चांभारली परिसरात ठिकठिकाणी जोरदार स्वागत

## पालखी सोहळ्यात अबाल वृद्ध सहभागी आई एकविरेच्या जयघोषाने रसायनी परिसर दुमदुमली

**दैनिक युवक आधार**
**सायनी आनंद पवार**

हाकेला धावणारी व नवसाला पावणारी अशी ख्याती असलेल्या महाराष्ट्रातील तमाम भक्तगणांचे आणि विशेषतः आगरी कोळी बांधवांचे श्रद्धास्थान असलेल्या कार्ला येथील आई एकविरा देवीचा पालखी सोहळा दरवर्षी मोठ्या भक्ती वातावरणात साजरा केला जातो.यंदाचा मानाचा पालखीचा मान पनवेल तालुक्यातील आपटा येथील कोळी बांधवांना मिळाल्याने सर्वच भक्तगणांमध्ये आनंदाचे व उत्सवाचे वातावरण दिसून येत होते. बुधवारी सकाळी सात वाजता आपटा कोळीवाडा येथून या पालखी सोहळा चा प्रारंभ झाला. पालखी सोहळ्यामध्ये सहभागी झालेल्या भक्तांना ठीक ठिकाणी नाष्टा



अल्पोपहार,थंड पेय, चहा,फळांची व्यवस्था ठेवण्यात आली होती. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी पालखीचे मनोभावे दर्शन घेऊन जोरदार स्वागत केले. पालखी सोहळ्यात अबाल वृद्धांसह हजारो भक्तगण सहभागी झाले होते.वाजत गाजत फुलांची उधळण करत फटाक्यांच्या आताषबाजीने व आई एकविरेच्या जय घोषणाने रसायनी परिसर दुमदुमून निघाला

# छोटीशी आशा ट्रस्ट मार्फत लाईट ऑफ लाईफच्या गरीब व गरजू विद्यार्थ्यांना विविध साहित्यांचे वाटप

**दैनिक युवक आधार**
**माणगांव - महेश शेलार**

माणगांव येथील सरलादेवी मंगल कार्यालय येथे नुकताच छोटीशी आशा ट्रस्ट मार्फत लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या माणगांव तालुक्यातील विविध गावातील विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिलाई मशीन, सायकल, गिटार, तबला, की-बोर्ड, ढोलकी, मेकअप किट, स्मार्ट वॉच, स्टडी टेबल, क्रिकेट किट वाटप करण्यात आले. यावेळी छोटीशी आशा ट्रस्टचे सीमा राम मॅडम, उन्मेष पाटील, धरेंद्र सिंग, लाईफ ऑफ लाईफ ट्रस्ट कडून असिस्टंट मॅनेजर श्रुती माळगुणकर मॅडम, वरीष्ठ आनंदो अधिकारी स्वप्नील सर, सेजल शहा, माणगाव ऑफिस येथील सर्व अधिकारी वर्ग मीनाक्षी उभारे, प्रसाद विचारे आणि सर्व सेंटर कार्यकारी आणि शिक्षक वर्ग उपस्थित होते. तसेच या संपूर्ण कार्यक्रमाचे पालक प्रतिनिधित्व म्हणून पांडुरंग भागूराम मोरे यांनी सांभाळले.

छोटीशी आशा ट्रस्टचा कार्यक्रम लाईट ऑफ लाईफ च्या माध्यमातून सकाळी अकरा वाजता दिपप्रज्वलन करून सुरु करण्यात आला असून यावेळी छोटीशी आशाचे पदाधिकारी तसेच खरवली विभाग, साई विभाग तसेच इंदापूर विभागातील विद्यार्थी वर्ग व त्याचे पालक वर्गानी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली होती. यावेळी उपस्थितीतांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, तुम्ही कोणत्याही क्षेत्रात शिक्षण घ्या आजच्या युगात शिक्षणापेक्षा कोणत्याही गोष्टीला महत्व नाही. शिक्षण हि काळाची गरज आहे.

छोटीशी आशाचा कार्यक्रम



लाईट ऑफ लाईफ यांच्या माध्यमातून अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला. तसेच हा कार्यक्रम दरवर्षी साजरा केला जातो. आणि यावेळी गरीब व गरजू विद्यार्थ्यांना विविध साहित्याचे वाटप केले जाते. छोटीशी आशा या ट्रस्टचे काम अत्यंत उत्तम पद्धतीचे आहे. गरीब व गरजू विद्यार्थ्यांना हेरून त्यांना त्यांच्या पुढील वाटचालीस प्रेरणा देत असतात.

# सुप्रसिद्ध मराठी चित्रपट अभिनेत्री मीनाक्षी पाखरे यांची संभाजीनगरला भेट

**दैनिक युवक आधार**
**कवी सरकारी इंगळी**

सुप्रसिद्ध मराठी सिनेमा तारका, मराठी चित्रपट व धारावाईक विविध सिरीयल मध्ये महत्त्वाची भूमिका साकारणाऱ्या सुप्रसिद्ध अभिनेत्री मीनाक्षी पाखरे यांनी छत्रपती संभाजीनगर येथे आल्या असता शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन मुक्ताईनगरचे राज्यसचिव व गणपतराव साळवे चॅरिटेबल फाउंडेशन छत्रपती संभाजी नगरचे अध्यक्ष अड सर्जेराव साळवे यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी त्यांनी मराठवाडा धर्मादाय वकील संघ कार्यालयास तसेच जिल्हा वकील संघास सदिच्छा भेट दिली. छत्रपती संभाजी नगर येथील न्यायालयास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भेट दिली होती. त्यांचे फोटो बघून त्या खूपच आनंदित झाल्या. औरंगाबाद जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष अड. मिलिंद पाटील सर , सचिव शिवराज चावरे साहेब, कार्यकारणी सदस्य तसेच मराठवाडा धर्मादाय वकील संघाचे सचिव अड अक्षय खोत सर, सहसचिव अड ज्योती थोरात मॅडम व इतर पदाधिकाऱ्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिद्ध कवी अड सर्जेराव साळवे यांनी वकील संघाला पाहुण्यांचा परिचय करून दिला. सत्काराला उत्तर देताना मीनाक्षी



पाखरे म्हणाल्या की, छत्रपती संभाजीनगर येथील आपल्या भेटीने मी अगदी भारावून गेले आहे. येथील प्रेमळ मनमिळाऊ लोकं व या ऐतिहासिक शहरातील औद्योगिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक प्रगती अभिमानास्पद आहे. छत्रपती संभाजी नगरचा ऐतिहासिक वारसा, येथील प्रेक्षणीय स्थळे, भौगोलिक वातावरण हे चित्रपट निर्मितीसाठी अतिशय सुंदर व पोषक वातावरण असून लवकरच या ठिकाणी चित्रपट निर्मितीसाठी प्रयत्न केले जातील. त्यापुढे म्हणाल्या की, माझ्या चित्रपट निर्मिती कार्याची सुरुवात छत्रपती संभाजी नगरीतून व्हावी अशी खूप इच्छा आहे. लवकरच माझे स्वप्न पूर्ण होईल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. छत्रपती संभाजीनगर वासियांनी जो हृदय सत्कार केला व भरभरून प्रेम दिले त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून त्यांनी सर्वांचे आभार मानले.

# दिव्यात आगासन येथे टॅकरद्वारे पाणी चोरणारे अनधिकृत नळ जोडण्या खंडित.

## पाणीटंचाई ग्रस्त दिव्यात लाखों लिटर पाण्याची चोरी उघड...

**दैनिक युवक आधार**
**अमित जाधव -**

ठाणे ता २ : ठाणे महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने बुधवारी दिवा - आगासन भागात 29 अनधिकृत नळ जोडण्या खंडित केल्या. तसेच, याच भागात सुरू असलेले 2 अनधिकृत टॅंकर भरणा केंद्रही तत्काळ बंद करण्यात आले. ही कारवाई आणि तपासणी मोहीम सुरूच राहणार असून पाणीटंचाई ग्रस्त दिव्यात लाखों लिटर पाण्याची चोरी उघड झाली आहे. हेच चोरी करून पाणी दिवेकरांना विकले जात असे. ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी अनधिकृत नळ जोडण्यांविरोधात कडक कारवाई करण्याचे निर्देश दिल्यानुसार अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे आणि नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी दिवा-आगासन भागातील अनधिकृत नळ जोडण्या खंडित करण्याची कारवाई करण्यात आली. याच भागात सुरू असलेल्या अनधिकृत टॅंकर भरणा केंद्राचा पंप, पाईपलाईन जप्त करण्यात आली. तसेच, अनधिकृत टॅंकर भरणा केंद्र बंद करण्यात आले आहे. याप्रकरणी पोलिसांत तक्रार नोंदवण्यात येत असल्याची माहिती उपनगर अभियंता विनोद पवार यांनी दिली. टाक्या, मोटर पंप जप्त करण्यात आले. ही कारवाई परिमंडळ उपायुक्त मनीष जोशी, उपायुक्त (अतिक्रमण)



शंकर पाटोळे, उपनगर अभियंता विनोद पवार, कार्यकारी अभियंता शशिकांत साळुंके, प्रशांत फिरके यांच्या उपस्थितीत मुंब्रा-दिवा प्रभाग समितीचा अतिक्रमण विभाग आणि पाणी पुरवठा विभाग यांनी संयुक्तपणेही कारवाई करण्यात आली आहे.

# डायलिसिस सेंटरच्या खारघर मध्ये उदघाटन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

रोटरी क्लब ऑफ खारघर मिडटाऊनने आरोग्यसेवेत ,खारघर मध्ये एका नवीन युगाची सुरुवात केली. गुढीपाडवा च्या शुभ प्रसंगी, सामुदायिक आरोग्यसेवेतील एक नवीन अध्याय लिहिला गेला. रोटरी क्लब ऑफ खारघर मिडटाऊन अभिमानाने त्याचे दीर्घकाळापासून प्रेम असलेले रोटरी डायलिसिस सेंटर चा उद्‌घाटन केले.

खारघर येथील डी-मार्ट जवळील सेक्टर १५ येथील खारघर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या दुसऱ्या मजल्याचे औपचारिक उद्‌घाटन डीजीई आरटीएन संतोष मराठे यांच्या सन्माननीय उपस्थितीत करण्यात आले.

क्लबचे अध्यक्ष आरटीएन शैलेश पटेल, सर्व माजी अध्यक्ष, क्लब चे सर्व सदस्य आणि अन्य मान्यवर पाहुणे उपस्थित होते.

अत्याधुनिक सुविधा असलेले हे केंद्र सध्या सुसज्ज आहे. वार्षिक ५,००० डायलिसिस सायकल क्षमता असलेल्या तीन पूर्णपणे स्वयंचलित फ्रेसेनियस काबी डायलिसिस मशीन सध्या लावण्यात आले. विस्तारित करण्याच्या योजना आधीच अस्तित्वात आहेत , अजून सहा मशीन्स लावण्यात येईल, ज्यामुळे ही जीवनरक्षक सेवा गरजू रुग्णांपर्यंत पोहोचेल अशी माहिती अध्यक्ष शैलेश पटेल यांनी दिली. केवळ वैद्यकीय सुविधा नसून, रोटरी डायलिसिस सेंटर आहे एक आशेचा किरण, दर्जेदार आणि परवडणारी डायलिसिस सेवा ही सर्वांना उपलब्ध होईल याची खात्री रोटरीचे




प्रोजेक्ट डायरेक्टर रवी किरण यांनी दिली.

# सौरग्राम टेकवाडी येथे गुढीपाडव्यानिमित्त स्वच्छता अभियान संपन्न

## _पर्याय प्रतिष्ठान आणि रोटरी क्लब ऑफ राजगुरुनगरचा स्तुत्य उपक्रम_

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी डॉ देवेंद्र ओव्हाळ .**

सौरग्राम टेकवाडी (ता. खेड) येथे गुढीपाडवा उत्सवानिमित्त पर्याय प्रतिष्ठान आणि रोटरी क्लब ऑफ राजगुरुनगर यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या उपक्रमात ग्रामस्थ, तरुण वर्ग आणि स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. गावातील सार्वजनिक ठिकाणे, मंदिर परिसर आणि मुख्य रस्त्यांची स्वच्छता करण्यात आली. प्लास्टिक कचरा संकलन, झाडांची छाटणी आणि स्वच्छतेसाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. या उपक्रमामुळे गावकऱ्यांमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण झाली. यावेळी पर्याय प्रतिष्ठानचे श्री. **वामनराव बाजरे** आणि रोटरी क्लब ऑफ राजगुरुनगरचे अध्यक्ष श्री. **राजन जांभळे** यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी ग्रामस्वच्छतेचे महत्त्व विशद करून, भविष्यातही असे उपक्रम सातत्याने राबवण्याचे आवाहन केले. ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच श्री. **विठ्ठलराव शिंदे** यांनी उभयतांचा सत्कार केला आणि ग्रामस्थांचे सहकार्याबद्दल आभार मानले. त्यांनी गावकऱ्यांना नियमित स्वच्छतेसाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी गावकरी श्री. **शांताराम बेडूंरे, नवनाथ भालेराव, स्वप्नील येवले, गबाजी बेडूंरे, सुमनबाई बेडूंरे, बबन बेडूंरे, दत्तात्रय शिर्के, संजय




बेडूंरे, संतोष बच्चे** यांनी विशेष मेहनत घेतली. उपस्थित ग्रामस्थांनी भविष्यातही असे उपक्रम राबवण्याचे आणि गाव स्वच्छ व सुंदर ठेवण्याचे आश्वासन दिले .

## बाप

डोळ्यात पाणी लपललं ,
मनात दुःख झाकललं,
चेहऱ्यावर तेज सांडलेलं,
असं बावनकशी रूप त्याचं ,
तो माझा बाप असतो !१ !

वेदना सोसीत जातो,
यातना विसरू पाहतो,
आमच्यासाठी हसत राहतो,
सोसतो, हसतो, विसरतो,
तो आमचा बाप असतो !२ !

हातपाय काळेकुट्ट ,
कपडालत्ता मळकुट्ट,
सपन उराशी अफाट,
थकतो, दमतो, पडतो,
तो आमचा बाप असतो !३ !

डोळ्यात नेहमी माया,
पाठीशी सदा छाया ,
रोजचं कष्टाची काया ,
झिजतो, झुरतो, जागतो,
तो आमचा बाप असतो !४ !

रात्र आमच्यासाठी जागतो,
थकवा झेलीत राहतो ,
लढाई पोटाची लढतो ,
फिरतो , लढतो, झेलतो,
तो आमचा बाप असतो !५ !

रक्ताचं पाणी करूनी ,
घामाच्या धारा वाहुनी,
अश्रुची फुले अर्पूनी ,
दमतो, पेरतो, लपवितो,
तो आमचा बाप असतो !६ !

**... प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर**

# छोटीशी आशा ट्रस्ट मार्फत लाईट ऑफ लाईफच्या गरीब व गरजू विद्यार्थ्यांना विविध साहित्यांचे वाटप..

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :-सचिन पवार**
**माणगांव रायगड**

**माणगांव** :-माणगांव येथील सरलादेवी मंगल कार्यालय येथे नुकताच छोटीशी आशा ट्रस्ट मार्फत लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या माणगांव तालुक्यातील विविध गावातील विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिलाई मशीन, सायकल, गिटार, तबला, की-बोर्ड, ढोलकी, मेकअप किट, स्मार्ट वॉच, स्टडी टेबल, क्रिकेट किट वाटप करण्यात आले. यावेळी छोटीशी आशा ट्रस्टचे सीमा राम मॅडम, उन्मेष पाटील, धरेंद्र सिंग, लाईफ ऑफ लाईफ ट्रस्ट कडून असिस्टंट मॅनेजर श्रुती माळगुणकर मॅडम, वरीष्ठ आनंदो अधिकारी स्वप्नील सर, सेजल शहा, माणगाव ऑफिस येथील सर्व अधिकारी वर्ग मीनाक्षी उभारे, प्रसाद विचारे आणि सर्व सेंटर कार्यकारी आणि शिक्षक वर्ग उपस्थित होते. तसेच या संपूर्ण कार्यक्रमाचे पालक प्रतिनिधित्व म्हणून पांडुरंग भागूराम मोरे यांनी सांभाळले. छोटीशी आशा ट्रस्टचा कार्यक्रम लाईट ऑफ लाईफ च्या माध्यमातून सकाळी अकरा वाजता दिपप्रज्वलन करून सुरु करण्यात आला असून यावेळी छोटीशी आशाचे पदाधिकारी तसेच खरवली विभाग, साई विभाग तसेच इंदापूर विभागातील विद्यार्थी वर्ग व त्याचे पालक वर्गानी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली होती. यावेळी उपस्थितीतांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, तुम्ही कोणत्याही क्षेत्रात शिक्षण घ्या आजच्या युगात शिक्षणापेक्षा कोणत्याही गोष्टीला महत्व नाही. शिक्षण हि काळाची गरज आहे. छोटीशी आशाचा कार्यक्रम लाईट ऑफ लाईफ यांच्या माध्यमातून अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला. तसेच हा कार्यक्रम दरवर्षी साजरा केला जातो. आणि यावेळी गरीब व गरजू विद्यार्थ्यांना विविध साहित्याचे वाटप केले जाते. छोटीशी आशा या ट्रस्टचे काम अत्यंत उत्तम पद्धतीचे आहे. गरीब व गरजू विद्यार्थ्यांना हेरून त्यांना त्यांच्या पुढील वाटचालीस प्रेरणा देत असतात.



# गुढीपाडव्याच्या निमित्ताने समजिविता फाउंडेशनतर्फे महिला दिन कार्यक्रमात नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्याचा सहभाग

**दैनिक युवक आधार**
**सुरेश भोईर (कार्यकारी संपादक)**

मुंबई नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्याला गुढी पाडव्याच्या निमित्ताने समजिविता फाउंडेशनतर्फे शिवाजीनगर, गोवंडी येथे आयोजित महिला दिन कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे नेतृत्व विवेक साळवी (मुंबई समन्वयक) आणि बॉस्को डिसोझा (कार्यकारी समिती सदस्य, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य) यांनी केले, जे या कार्यक्रमाचे सन्माननीय अतिथी होते. यावेळी त्यांच्यासोबत महेश वैद्य (ब्रँड अँबेसडर, नशा मुक्त अभियान, सोलापूर) देखील उपस्थित होते. तसेच, सामाजिक कार्यकर्ते विनोद सडविलकर यांनी आयोजकांना रुग्णसेवा विषयावर एक पुस्तिका प्रदान केली. या कार्यक्रमात विविध



सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, ज्याचे नेतृत्व समजिविता फाउंडेशनच्या साधना सावंत यांनी केले. नशाबंदी मंडळाला व्यसनमुक्तीच्या क्षेत्रात केलेल्या कार्याचा आढावा सादर करण्याची संधी मिळाली. विवेक साळवी यांनी आपल्या भाषणाद्वारे आणि पोस्टर सादरीकरणाद्वारे मंडळाच्या उपक्रमांची माहिती दिली. सदर कार्यक्रमाला 138 महिला आणि पुरुष मंडळींनी सहभाग दाखवला होता.

बॉस्को डिसोझा यांनी आपल्या भाषणात महिलांसमोर मद्य, तंबाखू आणि अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी माहिती दिली, जी उपस्थितांनी उत्स्फूर्तपणे दाद दिली. त्यांनी आश्वासन दिले की, नशाबंदी मंडळ भविष्यातही त्यांच्या भागात अशा उपक्रमांचे आयोजन करत राहील.

# लोंबकळणाऱ्या तारांचा स्पर्श होऊन कडब्याला लागली आग, चालकाच्या हूशारीमुळे टॅक्टर वाचला...

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**

**शिरूरआनंतपाळ :** तालुक्यातील येरोळ येथील जिल्हा परिषद प्रशाले पाटीमागे असलेल्या रस्त्यावर महावितरणच्या लोंबकळणाऱ्या तारेचा स्पर्श होऊन चालत्या टॅक्टर ट्रॉली मधील कडब्याने पेट घेतला परंतु चालकाने प्रसंगावधान राखत ट्रॉलीमधील कडबा रस्त्याच्या मध्यभागी टॅक्टरची ट्राली पलटी करुन पुढील अनर्थ टळला. येरोळ येथील बसस्टॅन्ड परिसरासह गावातील अनेक ठिकाणी महावितरण वीजवाहीन्या लोंबकळत आहेत. पांढरवाडी येथील शेतकरी शंकर गंभीरे पाटील यांनी त्यांच्या दुभत्या जनावरासाठी हानमंतवाडी येथील शेतकऱ्यांचा कडबा विकत घेऊन टॅक्टर ट्रॉली मध्ये घेऊन जात होते. परंतु येरोळ बसस्टॅन्ड जवळ



लोंबकळणाऱ्या तारेचा स्पर्श होऊन टॅक्टरट्राली मधील कडब्याने पेट घेतला. ही बाब टॅक्टर चालकाच्या लक्षात येताच चालकांनी ट्रॉली रस्त्याच्या मध्यभागी घेऊन ट्राली मधीलकडबा ट्रॉली पलटी करुन खाली केला.

ग्रामस्थांनी धावपळ करुन जवळच्या घरातील पाणी आणुन आग विजवण्याचा पर्यत्न करेपर्यंत पाचशे कडबा जळून खाक झाला होता. उपसरपंच सतिस सिंदाळकर यांनी महावितरणच्या साकोळ व शिरूरआनंतपाळ येथील संबधिताला वारंवार लोंबकळणाऱ्या तारा दुरुस्त करण्याची सुचना करुनही त्याकडे दुर्लक्ष झाल्याने शेतकऱ्याचे नूकसान झाले आहे. तर गेल्यावर्षी शेतातील लोंबचळणाऱ्या तारेच्या शार्टसर्किटमुळे शैलेश येरोळकरचा ऊस जळाला होता. महावितरणने लवकर लोंबकळणाऱ्या तारा दुरूस्त कराव्यात अशी मागणी उपसरंपच सतिस सिंदाळकर यांनी केली आहे.